हृदयांतलीं शब्दचित्रं - २

रघुवीर सामंत



# शहरचे भाई

आठव्या-नवव्या यत्तांसाठीं
पुरवणी वाचन

[तज्ञांच्या विद्यार्थी मार्गदर्शनासह]

कुमार श्रेणी
पुष्प १४ वें

मूल्य १५ आणे

अमर ज्योति वाङ्मय

हृदयांतलीं शब्दचित्रं-२

# शहरचे भाई

[ नमुनेदार मराठी शब्दचित्रैं ]


लेखक

रघुवीर सामंत


[ आठव्या-नवव्या यत्तांसाठीं पुरवणी वाचन ]

★

—विद्यार्थी मार्गदर्शन—

**श्री. श्यामराव एस्. पाटकर**, एम्.ए., एस.टी.सी.
[ मराठीचे अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुंबई ४ ]

**श्री. गोविंद जगन्नाथ सामंत**, बी.ए. (ऑ.), बी.टी.,एल्‌एल्.बी. (ठाणें)


दीपावलि १८७३ ]  पुष्प १४ वें  [ मूल्य १५ आणे

—अमर ज्योति वाङ्‌मय प्रकाशन—

किशोर श्रेणी -  - मनोरंजन

**सौ. स्नेहल सामंत**, पी. ए.
यांनीं
'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' करितां
१४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
**सौ. स्नेहल सामंत**, पी. ए.
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

**श्री. रघुनाथ ज. सामंत**, बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४,
येथें मुद्रित केलें.



# शहरचे भाई

## मंत्र—(विषय)

हल्लीं शहर व खेडेगांव यांचें संबंध फार जवळचे आलेले आहेत. पण अगदीं अलीकडेअलीकडेपर्यंत शहरांतल्या जीवनाची खरी जाणीव खेडवळांना नसे; 'ममयषा पावना' वगैरे नकलांमधला बिनोद याच खेडवळ अज्ञानावर आधारलेला असे. प्रो. फडके यांची अशीच एक गोष्ट आहे. त्यांत एक खेड्यांतला लेखक नावीन्य म्हणून शहरच्या वातावरणावर व दुसरा शहरचा एक लेखक खेडवळ वातावरणावर असे दोघे आपापल्या परीनें उत्तम लेख लिहितात. नि मग वर्णनाचा एकच एक गोंधळ कसा उडतो त्यांचें चित्र त्यांत दिसतें. म्हणजे असें, कीं- उदाहरणार्थ, मुंबईच्या धोबी तलावावर धोबी कपडे धूत असल्याचें वर्णन जितकें मूर्खपणाचें व खऱ्या वस्तुस्थितीच्या अज्ञानाचें ठरेल, तितकेंच खेड्यांत आपल्या घरासमोर मोटरमधून उतरणें किंवा ट्राममधून हुर्डा खायला जाणें किंवा तिथल्या स्टेशनवर व्हिक्टोरियातून घाईघाईनें जाऊन जनता एक्स्प्रेस पकडाण्याचें वर्णन असणें मूर्खपणाच आपल्या पदरीं आणील. अनुभवाशिवाय लिहिल्यास कधींहि असा मूर्खपणांच आपल्या पदरांत पडणार.

हें पुस्तक हातीं घेऊन, आज आपण आपल्या कांहीं '**शहरच्या भाई**'चें दर्शन घ्यायला निघालों आहों. आपण शहरांत वावरणारेच असलों तर आपल्याला ते सारे सुपरिचितच वाटतील. पण मग त्यांच्या जीवनांतलें आपल्या दृष्टीतून सुटलेले व आपल्याला पूर्वी न समजलेले अनेक बारकावे नि पैलू या वाचनांतून अवलोकनांत येतील. उलट, आपण खेडेगांवांतले असलों तर त्यांतील अनुभवाच्या नावीन्यामुळें हे '**शहरचे भाई**' आपल्याला अधिकच हृद्य वाटतील. तेव्हां, मुख्य म्हणजे—आपल्याला परिचित असो अपरिचित असो ती व्यक्ती बहुतांशीं हलती चालती आपल्या मनःचक्षूसमोर हुबेहूब उभी करण्याची प्रभावी ताकद नमुनेदार शब्दचित्रांत नेहमी असावयास पाहिजे.--

आणि या तुमच्या समोरील नऊ शब्दचित्रांपैकीं बहुतेकांत ती शक्ति बऱ्याच अंशांनी नक्की सांपडेल असें म्हणावयास हरकत नाहीं.

## [ धांवती ओळख ]

म्हातारा **आंधळा म्हाद्या** व हातांतल्या काठीबरोबर त्याला पुढें फरफटत नेणारा पोरगेला उनाड सुदाम्या यांची ती दुक्कल पहा. रस्त्या-रस्त्यांतून भिक्षा मागत फिरत आहे. जगाबद्दल म्हाद्याला व त्याच्याबद्दल जगाला हजारों विचार सुचतात–जातात—अखेर, त्याच्या आयुष्याच्या दोरी-बरोबरच त्याच्या मनांतील आशेचा तंतू व जीवनाचा धागा तटकन् तुटतो रस्त्याच्या दुसऱ्या टोंकाला तो **म्हमद्या फुगेवाला** 'पें पें ऽ' करीत फुगे उडवित–वाजवित चालला आहे. त्याच्या भोवतालची ती पोरट्यांची झुंड पहा! क्षणिक सुखाचे फुगे फुगवून–फोडून त्याच्या खिशांत हा भला मोठा गल्ला भरीत आहे. आणि तो '**काव् चाव्**' **चिनी !** आपल्या पोटाचें ओझें कमी करण्यासाठीं पाठीवर भलें मोठें ओझें मारून दारोदार फिरत आहे. अगदीं पांच पांच मजले चढउतार करीत आहे. जरा रस्त्यावर पलीकडे दृष्टी टांकली की **याकूब व्हिक्टोरियावाला** आपल्या घोडयाला चाबकाने चुचकारून '.टप्टप्' ठेक्यांत टांपा टाकून जात असलेला दिसेल. त्याचें तें जीवन आणखी निराळेंच ! त्याच्याकडे बघतां बघतां त्या **तुळशीदास ट्रामड्रायव्हरनें** 'आवसीडंन्'—केला बघा—पण मग तासन् तास समोर पहात नि दांडे फिरवत व पायाने घंटा बडवीत, ठरलेल्या रुळावरून सरपटत, मुंबईच्या या टोंकापासून त्या टोका पर्यंत चकरा मारतां मारतां, त्याचे डोळे गरगरून जात असतील, यांत आश्चर्य काय ? त्या रस्त्यालगतच्या कॉलेजच्या टोलेजंग इमारतींत शिरतांच पट्टेवाला **गणपत शिपाई** दिसूं लागला ना ? आपल्याच रुबाबात ठुमकत चालतांना नि पागोटें सांवरताना तो गमतीदार वाटतो कीं नाहीं ?– पण मग त्याचें जीवन अधिक जवळून पाहायला वास्तविक तुम्हांला एस्. एस्. सी. परीक्षा पास होऊन स्वतःच कॉलेजांत शिरावें लागेल. सकाळीं गिरणीचा भोंगा वाजतांच आपल्या बिछान्यांत खडबडून उठून बसणाऱ्या तुम्हां पोरांना **धाकू मजूर** दुपारची



शिदोरी घेऊन त्याचवेळीं धांवत धांवत एकदांचा आपल्या गिरणीच्या आवारांत वेळेवर शिरत असेल व मग दिवसभरचा त्याचा किती दगदगीने भरलेला आयुष्यक्रम असेल; तसेंच, संपाबर गेल्यावर त्याच्या घरांत काय होत असेल इ० गोष्टींची काय कल्पना असणार–व येणार ? तुमच्यापैकीं कित्येकांच्या थोड्याफार परिचयाचे **केशवमामा** मात्र असतील. पण मग त्यांच्या जीवनाकडे इतक्या सूक्ष्म दृष्टीने व व्यापक विचारांनी पाहण्याचा तुम्हालाहि प्रसंग आला नसेल. '**लखपती** ऽ!' म्हणून ओरडत छोटीं छोटीं पुस्तकें दर शुक्रवार–शनिवारीं पेपरवालीं पोरें विकत असतांना तुमच्या पाहण्यांत आलेलीं असतील. तरी पण मॅ. मानकामे महाशय किंवा पळनिटकरराव याच्यासारखे 'झटपट लखपती' नि त्यांना एका धांवेत 'लखपती' करणारे महालक्ष्मीच्या रिंगणांत दौडणारे तऱ्हेवाईक नांवांचे घोडे तुमच्यातल्या किती जणांना ठाऊक असतील ?––कां ?—आहेत कीं नाही आपले विविध जीवनाचे हे 'शहरचे भाई' ?

पण मग या साऱ्यांच्या जीवनाचे हे कांही इतिहास नाहीत. कॅमेऱ्यानें आपण जशीं धांवतीं चित्रें–स्नॅपशॉटस्–काढतों, तशीं हीं अनुभवांची–वरवरची पण बऱ्याच हुबेहुबपणें वस्तुस्थितीची चुणुक दाखवणारीं–धांवतीं शब्दरूप शब्दचित्रें आहेत. त्यांच्या वाचनांतून आपल्याला थोडें ज्ञान मिळेल. पण त्यापेक्षां जास्त निरीक्षणाची नवी दृष्टीच येईल.

त्यांच्याच काय कोणत्याहि मानवाच्या जीवनाचा सामान्य मध्यबिंदु व सर्वसामान्य धागा एकच असतो. आणि तो म्हणजे–आशा !–उद्यांची आशा !–या प्रबळ आशेचेंहि अप्रत्यक्ष चित्र या सर्व शब्दचित्रांच्या रूपानें तुमच्या अभ्यासांतून तुमच्यासमोर उभें राहील––शहरच्या जीवनातील पळापळ व धडपडहि सर्वसाधारण साकल्याने तुम्हाला अनुभवतां येईल.

पूर्वी आपण पाहिलेल्याच गोष्टी ! पण त्याच अधिक सूक्ष्म तऱ्हेने अशा पुन्हां पाहण्यांत मजा असते. त्याप्रकारची ही अशी नवी चुरस तुमच्या मनांत नव्याने उभी राहावयास हवी. आणि तशी ती जाणीव तुम्हाला झाली कीं मग तुम्हाला पटेल कीं––

" Hope is the anchor of life,
Hope is the helmet of salvation;
Hope is the poor man's bread,
Hope is the happy man's dream. "
—Pliny

## तंत्र ( पद्धति )

या व्यक्तींचें व त्यांच्या सर्वसामान्य जीवनाचें दर्शन असें शद्बचित्रांच्या साह्यानें घडवण्यासाठीं कलावंताला आपल्या अनुभवाच्या मालमसाल्याची निवड फार काळजीपूर्वक व कल्पकतेनें करावी लागते. 'शब्दचित्र' हें शब्दांतच काढायावचें असलें तरी त्या शब्दांमागील अर्थ, अर्थामागील भावना, विचार, अनुभव, दृश्यें यांची सूक्ष्मतम ओळख त्याला आगाऊ असावी लागते. त्यासाठीं त्याचें संस्कारक्षम मन सखोल निरीक्षणाच्या हितकर सवयींमध्यें नेहमी रूळलेलें असावें लागतें. हजारों गोष्टीची अप्रत्यक्ष पाहणी त्यानें आगाऊंच केलेली असल्यामुळें त्यांतून त्याला अत्यावश्यक वाटणाऱ्या निवडक बाबींचीं हवी तेव्हां व हवी तेथें योजना करणें सुलभ जातें. त्यासाठीं जरूर त्याच पद्धतीच्या सुरवात–मध्य-शेवटाची रचना–मांडणी त्याला सुचते–पटते; व मगतीच तो आपल्या-कृलाकृतींत वापरतो. तो मांडणी करतांना-शब्द-योजना वाक्य-योजना, प्रसंग-योजना यांच्या समर्पक निवडीनें त्याला मनांतल्या मनांत आधीं कल्पिलेला विशिष्ट परिणाम वाचकांच्या मनावर घडवून आणतां येतों. एक लक्षांत ठेवा–शब्दचित्र हा केवळ पिनहोल कॅमेऱ्यांतून निघणाऱ्या यांत्रिक फोटोग्राफचा प्रकार नव्हे. तर कुशल छाया–लेखकानें किंवा चित्रकारानें आपल्या विशिष्ट दृष्टीकोनातून ( चित्रित करावयाच्या विषयीभूत बाबींचें ) स्वतःला हवें व दुसऱ्याला दाखवावें असें वाटतें, त्याच दृष्टींकोनानें काढलेलें ( अत्यावश्यक तेवढेंच निवडून उठाव दिलेलें ) हेतुपूर्ण व कलापूर्ण असें तें कुशल चित्रण असतें. थोडक्यांत–विषयाचें सूक्ष्म निरीक्षण, सुसंस्कृत आकलन,



व्यक्तिगत विशिष्ट दृष्टिकोन व सामाजिक हिताचें संस्करण व सूचक कल्पक मांडणी–रचना या सर्वांच्या सर्वांगसुंदर संगमातूनच उत्कृष्ट शब्दचित्र कलाकृति होऊं शकते.

या एकंदर दृष्टीनें या पुस्तकाचें तुम्ही वाचन करावयास हवें आहे. आणि म्हणून यासाठींच या ' शहरच्या भाई ' चा तांत्रिक बाबींच्या दृष्टीनें खालील प्रकारें व या सारख्या अन्यदृष्टीनें तुम्हीं अभ्यास करावयास पाहिजे.

**अभ्यास**

### १ म्हाद्या—

१ ) विडीवाला व पानानें तोंड रंगलेला पोऱ्या, त्याचें जीवन वर्णन–काठीच्या दोन टोकांतील दोन ध्रुवाइतकें अंतर दाखवून मग केलेलें म्हाद्याचें वर्णन लक्षपूर्वक वाचा. असें कां केलें असावें ?–

२ ) म्हाद्या भोंवतालच्या समाजाची त्याच्याबद्दलची व स्वतःच्या सुखदुःखाबद्दलचीं वाक्यें–मुक्तफळें–सुदाम्याची स्वयंकेंद्रित बेफीकीरी तर म्हाद्याच्या मनांतील अशा निराशेचा अव्याहत चाललेला झगडा यांच्या चित्रणाचा सूक्ष्मपणें अभ्यासा—

३ ) अधून मधून विखुरलेली लोकांची निर्विकार मनाची नाट्यछटात्मक वाक्यें कशी सूचकतेने वर्ण्य विषयाला उठाव देतात तें पाहा.

४ ) ॲक्सीडेंट व गर्दीचें वर्णन, डॉक्टरी चिरफाडीचें वर्णन, यांचा या शद्बचित्रांच्या परिणामाच्या बाबतींत कसा उपयोग करून घेतला आहे हें अभ्यासपणें पहा.

५ ) " 'कुत्रं सुद्धां पोट भरतं ' म्हण आहे. " ' विषमता आहे म्हणून मजा आहे ! ' ' बाकीचे नुसते व्रणाकडे पाहून हसतात. ' ' मेलेल्या आशांची भुतं त्याला नेहमीच भंडावीत, ' 'पोटाची धडपड एकदांची शांत झाली होती ! ' ' सजीव तोंवरी—सन्मान–, ' ' आशेच्या धाग्याला—जीवित संपलं !' ' त्या दिवशीं—ज्ञान देत होतं ! ' इत्यादि वाक्यांची योजना कशी व कोणत्या कारणासाठीं केली आहे, तें पाहा—

## २–३ म्हमद्या–काव्चाव्

१) दोघांचें शारिरीक वर्णन, दोघांचें पोटार्थी भ्रमण, दोघांचा जीवन हेतू, त्यांच्या हालचालींचा इतरांवर व इतरांच्या हालचालींचा त्यांच्यावर होणारा परिणाम, इ. चें सूक्ष्म व यथार्थ वर्णन मोजक्या शद्वात कसें केलें आहे, तें अभ्यासा.

२) खालील कल्पनांचा विस्तार करा. 'जगाच्या बहिरंगावर भुलूं नका—नेम नाहीं' 'पाठीला ओझं बांधावं तेव्हांच पोटाचं ओझं कमीं होतं' 'आशा–महान् आशा!'

## ४ याकूब—

१) पहांटे व्हिक्टोरियाची हालचाल, शहर जागें झाल्याचीं चिन्हें, ट्रामसाठीं धडपड, याकूब घरीं आल्यावर, पावसांतला धंदा, याकूबचें कल्पना-चित्र इत्यादि वर्णनें काळजीपूर्वक अभ्यासा.

२) 'पैसे न्हाईत का खिशामंदी' 'वारं उलटं फिरलं होतं' असल्या कांही वर्णनांनी चित्रणाला आलेला उठाव रचनेच्या दृष्टीने लक्षांत ठेवण्या-सारखा आहे.

## ५ तुलसीदास––

१) 'मधलं बोट नि आंगठा यामधें धरुन,' 'उरलेला ट्रामच्या एका फटींत फुसला' असलीं या सर्व शब्दचित्रांमधील वर्णनातील सूक्ष्मता, निरीक्षणाचा कसा उपयोग करतां येतो तें तुम्हाला दाखवील.

२) 'दोन रुळांतील अंतर दृष्टीला अगदीं थोडं,' 'तो एखाद्या निर्जन अरण्यांत जखडून टाकल्यासारखा होता,' 'सुटी बड्या लोकांकरितां असते,' 'ते मेले असते तर बोललेच नसते!' 'ट्राम लायनीवर 'ओरटायमा' ला किंमत नसते!' असल्या वाक्यांचा किती मार्मिक उपयोग करून घेतला आहे तें पहा.



## ६ गणपत—

१) वामनमूर्ति, आभरणें, इतमाम, मार्गप्रतीक्षा, कैवार, आशाळभूत चचपा, चर्पटपंजरी, कर्तुमकर्तुम् शक्ति, इत्यादि शब्दयोजना मुद्दाम लक्षांत घेऊन तसल्या शब्दांचा भरणा वाढवा व तो मार्मिकपणें वापरावयास शिका

२) 'किती का शिकलेलों असेना!' 'मुलाला कॉलेजांत घालणार होता' असल्या वाक्यांनी वर्णनाला उजाळा मिळतो. विनोद सर्वांनाच आवडतो; पण तो चमत्कृति, विकृति, अतिशयोक्ति, सूचकता इ. प्रकारें तयार करणें कौशल्याचें असतें. हें ध्यानीं घेऊन विनोद स्वतः तयार करायला शिका.

## ७ धाकू—

१) पैशाचें ओझें, दुडुब्रम्हा, माणसानें काढलेलें चित्र, व्यक्ति व झुंड यांचा झगडा, इत्यादी कल्पनांनी युक्त असे पहिले दोन सुरवातीचे खंड केवळ पार्श्वभूमीसारखे वापरून मग धाकूला हळू हळू पुढें आणला आहे. ही रचना जरा निराळी आहे. असें का केलें असावें?

२) कल्पना--विस्ताराच्या दृष्टीने खालील वाक्यांना खुणा करा— 'अमर्याद स्वार्थ हाच जगांतला ब्रह्मदेव.' 'पैशाचं नाटक करणंहि अशक्य' 'मोटरीतून–अस्पष्ट चेहरे दिसत नाहीत.' 'दुःखांत भागीदार–सुख शोधण्याची मनुष्याची प्रवृत्ति असते,' 'पुढाऱ्यांच्या बोलण्याच्या—इच्छा असते' यांतील प्रत्येक कल्पनेवर विचार करून स्वतःच्या शद्बांत एक एक मूद्देसूद परिच्छेद लिहा.

## ८ केशवमामा—

१) ध्येयवाद व ध्येयशून्य चाकोरी यांचा झगडा या शब्दचित्रांत अप्रत्यक्षपणें प्रतिबिंबित केला आहे. कोणत्या पात्रांच्या व कोणत्या धांवत्या प्रसंगांच्या साह्याने?

२) हास्यास्पदता व उपहास यांचें अस्त्र कित्येकदां फार परिणामकारक

होतें. ‘ कारकूनसारखे देशी शब्द–’ ‘ मौज म्हणजे— वगैरे ’ ‘ मुकाट्यानें हसला–’ ‘ अर्ज लिहिण्याचा धंदा ’ ‘ तीं शेफारून जायचीं ना ? ’ ‘ दोनचार तांबे या खांद्यावर–’ ‘ खिशांतलं खांड तोंडांत टाकीत रस्त्यावर उडी ’ ‘ घाल म्हणावं तुझ्या बोडक्यावर—’ ‘ हा एक मोठा प्रश्नच ! ’ ‘ जांभई देत जेवायला उठायचं—’ ‘ हातांतलं पुस्तक म्हणजे झोंपेचं औषध ’ ‘ रात्र संपली—सोमवार उजाडला ! ’ ‘ एका आख्ख्या रुपयाचे पेढे वांटले ’ ‘ हेंच आमचं दारिद्य नि हीच आमची श्रीमंती– ज्याला जसं वाटेल तसं म्हणावं ’ ‘ जांभई देत विचार करीत होते ’ ‘ तेवढे–सरकार नाही सरकारचा बाप देईल —’

३ ) यांत उपयोगांत आणलेल्या ठिकठिकाणच्या ‘ नाट्यछटात्मक तंत्रा’ची उपयुक्तता लक्षांत घ्या.

## ९ बॅ. मानकामे—

१ ) गोष्टीसारखी सुरवात पण पुढें कथानक तर खलास होऊन एकच प्रसंगाभोंवतीं रेंगाळत आहे. असल्या या रचनेंत विशेष व्यक्तीवरून सामान्य देखाव्याकडे जाण्याचें उपयुक्त तंत्र आहे. कारण, पुढें सामान्यांच्या भाव-भावनांत, सुख–दुःखांत, यशापयशांतच मानकामे–पळनिटकर या दोन विशेष व्यक्ती विलीन होतात.

२ ) रेस स्पेशलमधील हालचाली व कोर्सवर जमलेल्या विविध लोकांचें वर्णन परिणामाच्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

३ ) कल्पना विस्तार करा—‘ सुखांत दुःख दुःखांत सुख ’—‘ एकाच्या सुखांत दुसऱ्याचं दुःख ! ’ ‘ आहे त्या स्थितींत कोण संतुष्ट असणार ? ’ ‘ आशा–अमर आशा ! ’

---

# हृदयांतलीं शब्दचित्रं-२ शहरचे भाई

[ १ ] म्हाद्या..........( अंध भिकारी )
[ ९-२९ ]

[ २ ] म्हमद्या...........( फुगेवाला )
[ ९-२९ ]

[ ३ ] काव्चाव्..( चिनी कापडविक्या )
[ ९-२९ ]

[ ४ ] याकूब....( व्हिक्टोरिआवाला )
[ ९-२९ ]

[ ५ ] तुलसीदास......( ट्रामड्रायव्हर )
[ ५-३० ]

[ ६ ] गणपत.............( शिपाई )
[ ५-३० ]

[ ७ ] धाकू.............( कामगार )
[ ६-१-३२ ]

[ ८ ] केशवमामा...........( कारकुन )
[ २०-८-३१ ]

[ ९ ] बॅ. मानकामे......( ‘ लखपती ’ )
[ ९-२९ ]




[१]

## [–अंध भिकारी–]

–१–

काळं मळकट बंडीवजा अंगातलं, दोन पायांत शेव सुटलेली लंगोटी' डोक्याला फाटकीशी टोपी; असा त्या पोऱ्याचा पोशाख ! त्यांचं वय असेल बारातेरा वर्षांचं !—पण अर्धी ओढून ठेवलेली विडी कानाला चिकटलेली दिसत होती. तोंड पानानें रंगलेलं ! खाकेंत लांब काठी !—

मागच्या टोंकाला धरुन चालणाऱ्या आंधळ्या म्हाद्याला हें कांहीं माहीत नव्हतं !...त्याच्या डोळ्याच्या खांचा झालेल्या—

म्हाद्याच्या आंधळेपणामुळेंच काठीच्या दोन टोंकांमधील अंतर दोन ध्रुवांतील अंतराएवढं वाढलं होतं !...

पण एवढं बरीक खरं, कीं, तो पोऱ्या त्या आंधळ्याची काठी होता.

म्हाद्या—दाढीमिशा व डोक्याचे केंस यांचं पांढरं शुभ्र जंगल झालेला, चेहऱ्याशरीराला जागजागीं सुरकुत्या पडलेला, अंधपणामुळें डोळ्यांच्या खांचा झालेला ! लक्तऱ्या झालेली बंडी व चाळणीसारखं धोतर यांत आपलं काळंकाभिन्न अंग कसं तरी लपवून—आपल्या म्हातारपणाचे दिवस जिवाच्या अट्टाहास करीत घालवित होता बिचारा !—

'कुत्रं सुद्धां पोट भरतं !' म्हण आहे. पण गरीब म्हाद्या ! कुत्र्याप्रमाणें 'हडहड' सोसूनही रोजचा शेर मिळविण्यासाठीं किती धडपड त्याची ?

'अहो, अशी विषमता आहे जगांत म्हणून तर मजा आहे !—'

खरं आहे! पण या गहन विचाराचं म्हाद्याला काय? त्याचा प्रत्येक नवीन दिवस धडपडण्यांतच जायचा!—

—२—

पहांट होतांच म्हाद्या उठला! पोऱ्याच्या मदतीनें तो एका जवळच्याच स्टेशनजवळ धडपडत धडपडत गेला. त्याला तिथं सोडून पोऱ्या कुठं जवळ-पास भटकायला निघून गेला.

म्हाद्यानें हात पुढं पसरला. कोणाची चाहूल लागली कीं तो ओरडे, "द्या होऽ दादाऽ एक पैसा..."

येणाऱ्या जाणाऱ्यांचे चेहरे दिसत नव्हते. पण शब्द मात्र ऐकूं येत—

"एऽऽ, एक पानपट्टी देव"– "कालचा सिनेमा छान होता नाहीं?"– "हा कोट अगदींच फाटला बुवा! दुसरा शिवला पाहिजे एक"—"बाळ, रडूं नकोस हं! तुला फुगा घेऊन देईन मग!"–"पिस्ताबदाऽऽम, चेऽऽसऽ नट!"... "ए टॅक्सी...कालाऽ घोडा...जलदी..."

एक न् दोन?—पैसेवाल्यांचे आणि पैसेवाल्यांसाठीं हजारों आवाज चोहोंबाजूंनीं ऐकूं येत होते सारखे.

पण म्हाद्याला काय त्याचं? तो एखादी दिडकी देणाऱ्या शेटची वाट पहात ओरडत होता—"दे रेऽ नारायणा एऽऽक पैसा!...कोणी हरीचाऽ लाऽल्??"

ईश्वराची आठवण त्याला नाहीं होणार तर कोणाला?

"दयाळु शेट सावकार!" तो आशीर्वाद देई. त्यामुळें दिडकी देणारा एखादा गरीबही 'दयाळु शेट' होई. आणि खरोखर गरीब लोकच दयाळु शेट असतात.

स्वतःला जखम झालेल्या माणसालाच दुसऱ्याच्या जखमेची खूण पाहून भडभडून यतं!...बाकीचे नुसते व्रणाकडे पाहून हंसतात.



—३—

सूर्य बराच वर आला. तरी म्हाद्याला दोनतीन पैशांवर कांहीं मिळालं नाहीं. पोऱ्यानें मधल्यामध्येंच कांहीं पैसे विड्यांना उपटले होते. तो डोकं वांकवून टोपी अलगद हातांत घेऊन एखादी बिडी काढी; तेव्हां हें सहज दिसून येई.

दोन तीन पैशांनीं म्हाद्याचं काय होणार? त्यानें दुसरीकडे कुठं तरी जाऊन उभं रहाण्याचा विचार केला. 'सुदाम्या अऽऽसुदाम्या!' त्यानें पोराला हांक मारली...

सुदाम्या लांब, एका बाजूला विडी ओढत बसला होता. म्हाद्याची हांक ऐकूं येतांच तो कुरकुरत उठला; नि त्यानें त्याला जवळ जवळ ओढीतच रागारागांत दुसऱ्या कडेला चालविलं.

करणार काय बिचारा म्हाद्या? गप्प राहिला! त्याचं सर्व आयुष्यच परावलंबी होतं!!...मग एवढ्या तेवढ्याशासाठीं तो कशाला कुरकुरणार?

दोघे हमरस्त्यावर येऊन उभे राहिले. कडेला उभे राहून मोठ्यानें ओरडून याचना करूं लागले. मधूनच एखादा जातां जातां खिशांत हात घाली (त्यावेळीं पोऱ्याला मोठी आशा उत्पन्न होई.) पण इतक्यांत तो दूर निघूनच जाई किंवा त्या मनुष्याच्या खिशांतून ट्रामचं वापरलेलं चुरगळलेलं तिकिट निघे. तत्काळ बापड्या सुदाम्याची निराशा होई!

या बाबतींत म्हाद्या मात्र सुखी;...त्याचा आंधळेपणाच त्याला मदत करी.

—४—

सूर्य डोक्यावर चढूं लागला. म्हाद्याला आपल्याला पोट असल्याची जाणीव हळूहळू होऊं लागली.

जिकडे तिकडे प्रखर प्रकाश असूनही त्याला कांहीं दिसत नव्हतं. चोहींकडे त्याच्यापुरता तरी काळोख पसरला होता.

त्याच्या अन्नाचंही असंच होतं !

" आईऽऽ. आंधळ्याला वाढाऽऽ ! " मग तो चाळीच्या मधल्या चौकांत जाऊन ओरडूं लागे. मिळालं तर तिथंच ! ( एखाद्या बंगल्यासमोर मिळण्याची मुळीं आशाच नको. )

( शाबूत असले तरी फुटतील असा– ) अन्नाच्या नाशाचा तिथला देखावा त्याच्या फुटक्या डोळ्यांना दिसत नव्हता;...नि हें फार बरं होतं !!

फुटपाथच्या एका टोंकाला बसून सतरा ठिकाणी मिळालेले जिन्नस एके ठिकाणीं करून त्या बापलेकांनीं आपली भूक शमविली.

थोडा वेळ अगदीं आनंदी आनंद !–

–५–

पण ती पोटाची खळगी कायमची भरते थोडीच ?

थोड्याच वेळांत ' सायंकाळचं पोटं ' धडपडूं लागलं !

थोड्या वेळानें त्यानें पोऱ्यासह प्रत्येक दुकानापुढें याचनेस सुरवात केली.

' माफ करो भाई '–' पुढचं दुकान गांठ '—' कांहीं काम धंदा करायला काय झालं ? '—' पोट नाहीं भरत तर जीव दे ! हॅः हॅः !! '—अशा तऱ्हेचे हजारों उपदेशाचे घुटके त्याला मिळत होते.

पण कोणीही ह्या सुक्या शद्बांखेरीज त्याला कसलीच मदत करीत नव्हता ! –' माफ करून ' किंवा ' पुढचं दुकान गांठून ' त्याला तींच उत्तरं पुन्हां पुन्हां मिळणार होतीं !

'कामधंद्या'च्या सुक्या गप्पांना चार चव्वल लागतात थोडेच ??

त्याला आतां वैताग आला ! सकाळपासून धडपडून धडपडूनही फारसे पैसे जमले नव्हते. तो एका गल्लीच्या तोंडाशीं उताणा पडला; नि पोटावर जोराजोरानें हात आपटत ओरडूं लागला, ' पोटापुरताऽ ! लाचार हाय् शेट ! !' ...येईरेऽ विठोब्बा ! !"



" गरीब बिचारा ! " —' खरचं आंधळा आहे का हो हा ? '—" पोटाची चामडी पहा कशी मारून मारून काळी पडलीअय् ! "—" ढोंगी लेकाचा ! यानं म्हणे परळच्या बाजूला मोठं इस्टेट केलय् ! "—" हिंदुस्थान नुसतं भिकाऱ्यांचं आगर ! "—पुन्हां सर्व तेंच !

शाद्बिक सहानुभुतीला किंवा सुक्या तत्त्वज्ञानाला आपलं काय खर्च होतं ?

–६–

संध्याकाळ झाली; पोऱ्या पेटींतून विडी काढत काढत त्याला तेथून नेण्यासाठीं आला. म्हाताऱ्याला वाटत होतं सुदाम्यानें कांहीं मिळवून आणलंय !

पण आजपर्यंत त्याच्या कितीशा आशा सफल झाल्या होत्या ? त्यांतच ही एक भर !...मेलेल्या आशांचीं भुतं त्याला नेहमींच भंडावीत !...

कितीक दिवस असे निघून जात होते; प्रत्येक रात्रीं मात्र दुसऱ्या दिवसाबद्दलच्या आशा म्हाद्याच्या म्हाताऱ्या आंधळ्या डोळ्यांपुढें थैमान करीत असत.

यापेक्षां जास्त पैसे मिळतील, यापेक्षां जास्त चांगलं अन्न खावयास मिळेल ! असल्या विचारांनीं त्याचं मन सदा व्यापलेलं !

पण हे खटाटोप नि विचार तो मेरेपर्यंत सुटतात थोडेच ?

बाकी हेंही कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. त्यालाही जर तसंच वाटलं असतं...तर त्यानें जीव जगवण्याची एवढी धडपड तरी कशाला केली असती ?

–७–

" कर्रर्र...कर्रर्र...खस्स्..." ब्रेक एकदम दाबल्याचा कर्कश भयंकर आवाज झाला !...अपघाताच्या वेळीं गर्दी व्हायला वेळ लागत नाहीं.

" आतां कसला जगतो हो तो ? पेंकाट तर सगळं मोडलं ! " " मेला बिचारा ! "–" अन् पोऱ्या कुठं मरायला गेला होता ? "—"मोटारवाल्याला

तरी लेकाला अक्कल होती कीं नाहीं ??" "अहो, तो तरी काय करील ? सांगा ?...हल्लीं या भिकाऱ्यांचा नुसता सुळसुळाट झाला आहे ! !" —
"कशाला मधें मधें मरत होता कोणास ठाऊक ?"......

पुष्कळ निरानिराळे आवाज ऐकूं येत होते. मध्यें एक प्रेत पडलं होतं !...

तें म्हाद्याचंच होतं. जवळपास सुदाम्या नव्हता म्हणून तो स्वतःच इकडून तिकडे जाण्याचा प्रयत्न करीत होता; मोटार ड्रॉयव्हरनें खूप प्रयत्न केला;... पण...बिचाऱ्याच्या पोटावरून दोन्ही चाकं गेलीं होतीं. पोटाची धडपड एकदांची शांत झाली होती !

मोटारवाल्या शेटवर मेलेल्या गरीब म्हाद्यानें फिर्याद तरी कशी करायची ? कुठल्या कोर्टांत ?...कोणापुढें ??

"अरेरे ! मेला बिचारा !"—पुष्कळांच्या तोंडून साहजिकच शब्द आले.

–८–

आणि हॉस्पिटलमध्यें त्याला मोटारीतून नेण्यांत आलं. रक्तबंबाळ, लुल्या म्हाद्याकडे पाहून, सर्वांची सहानुभूति उचंबळून आली.

मेल्यानंतर मान !! मरेपर्यंत मात्र बिचारा सारखा धडपडत होता !

'सजीव तोंवरि लत्ता देती ! मरतां घेती खांद्यावरती !! उरफाटां सन्मान !!!' झालं ! गेलं !!–आशेच्या धाग्याला बांधून ठेवलेलं त्याचं जीवित संपलं !...

—पण त्या दिवशीं हॉस्पिटलमध्यें विद्यार्थ्यांना म्हाद्याचं तें बेवारसी मढं हृदय वगैरे मानवी इंद्रियांचं कांटेकोर ज्ञान देत होतं !!




[२]

## [–फुगेवाला–]

–१–

"पुर्रक्...पुर्र...क्...पैंवें sssपैंवेंs !"

एक पेपेर तोंडांत धरून, नि त्यावर आपल्या उजव्या हातांचीं बोटं नाचवून;...तो रस्त्यानें जातांना एका ठराविक गाण्याचे सूर काढीत होता.

त्याचा पोषाख साधा व मळकटच ! तांबड्या रंगाचा पायघोळ फडका, एक फाटका सदरा, त्यावर एक काळं जाकीट, खांदा व जाकीटाचा मुंडा हात यांत अडकवलेला भडक रंगाचा पण फाटकासा रुमाल, डोक्याला एक फेट्यावजा गुंडाळलेलं मळकं पट्ट्यापट्याचं रंगीत 'लुगडं' !

फारसा म्हातारा नव्हता तो ! त्याच्या मोठाल्या मिशा अजून कांहीं पिकलेल्या नव्हत्या. तोंड रुंद, नाक मोठं, भिंवया वाढलेल्या, मिशांचे कल्ले वर चढलेले !— यामुळें त्याच्या चेहऱ्यांत थोडी उग्रता आली होती.

रडणाऱ्या मुलांना तो 'बुवाजी' वाटून भिती वाटे;..पण हंसणाऱ्या व खेळकर मुलांना त्याला पाहून नाचावसं वाटे !—

–२–

खांद्यावर एक काठी,..तिला गुंडाळलेल्या गवतांत खोंवलेल्या चक्र्या व भिंगऱ्या तो चालला कीं गरगर फिरत ! वरच्या बाजूस अडकवलेल्या बांबूच्या पेपेऱ्यांची जाहिरात तो वाजवीत असलेली एक पेपेरी करीतच असे. फुगवून

अडकाविलेले फुगे,...अगदीं वरच्या टोंकाला वर-खालीं वर-खालीं नाचणाऱ्या-चिमण्या;...त्या पाहून मुलांचाहि जीव खालींवर होई.

रस्त्यानें जातांना कोणी लहान मूल दिसलं, की, तो लागलीच उड्या मारणारी चिमणी, पेपंर किंवा एखादी रंगीबेरंगी भिंगरी त्याच्या पुढें करून म्हणे; "हांऽ हांऽ! बाबासाब, बहोऽत अच्छावाला हैऽ! ऐ देखोऽ! कैसी खेल खेलती है तुम्हारे वैसी!!"

मुलांच्या मनांत तो भयंकर चलबिचल उत्पन्न करी; आणि बरोबर असलेल्या मोठ्या माणसाकडे सहेतुक मुद्रेनें पहात तो सापेक्ष साह्य हास्यहि करी.

त्याच्या त्या मुद्रेंत आशा परिपूर्ण भरलेली दिसे!...

—३—

"आईऽ! एऽ आई! मला फुगाऽ पाहिजे ग तो..."
"बाळ, कशाला उगीच्च? पैसे पडतात त्याला!"
"नाय् बास! मला पाहिजे!! अंऽ अंऽ..."
"न् मी ती चिमणी घेणार—"
"आईऽमला भिंगरी..."
"मेल्यांनीं नुसता उच्छाद मांडलाय् अगदीं...!"
"अंऽ अंऽ, मी नाय् जाऽ..." "एऽऽ" "देऽना ग आईऽ!"
"बरं जा घ्या! नका उठवूं डोकं!"
"ए, ए, फुगेवाला! थांब..."
एखाद्या चाळींतून वरील संवाद नि मग जिन्याचा धडधडाट होई!—
मग म्हामद्याला मुलांचा वेढा पडे.

"एऽ ही भिंगरी दे—" "तो फुगाऽ केवढ्याचा रेऽ?" "ए ताईऽ, मी चिमणी घेऊं का पेपेंरी घेऊं ग??"

एकच कानठळ्या बसवणारा गलबला होई.



दिडकी दिडकी करून त्याच्याकडे हा मोठाथोरला खुर्दा जमे!!

ती लाट एकदां ओसरली, कीं, पुन्हां तें पूर्वीप्रमाणें सर्व उचलून 'पेंप्पेंऽ पेंऽ!' करीत तो पुढें चालूं लागे.

इतक्यांत, एखादा मुलगा-"ए फुगवाला, हा फुटला नारे फुगा!" म्हणून रडत येई. म्हमद्या हंसे. मोफत नवा फुगवून हातीं देई; कधीं कुरकुरेहि.

त्यानें त्याला दिडकी घेउन नवा फुगा काढून दिला तरी त्या पोराचं मात्र समाधान होई. (कारण, तो फुगाही थोड्याच वेळांत फुटेल, ही त्याच्या बालमनाला पुढली नवी कल्पनाही नसे!)

—४—

स्वतःच्या पोटाच्या आशेनें म्हमद्या असाच गल्लोगल्लीं फिरत असे! त्याची आशा सफल होणं हें लहान मुलांना आशा उत्पन्न करण्यांतच असे. प्रत्येक मुलाला तो फुगा, भिंगरी किंवा पेपेंरी देई. एकच प्रकारें पेपेंरं वाजवीत... अशी आपल्या जीवनांतली भिंगरी चालू ठेऊन रोजच्या आशेचे आपले फुगे म्हमद्या क्षणोक्षणीं फुगवी.

त्यानें इतकीं वर्षं या जगांत काढलीं होतीं. त्याला या आशानिराशामय जगाचा कटु अनुभव चांगलाच आला होता. बऱ्याच अडीअडचणीतून सुद्धां जावं लागलं होतं त्याला!...

तो मागला सर्व इतिहास आठवून त्याचा जीव हातांतील वर खालीं होणाऱ्या चिमणीच्या हालचालींप्रमाणेच खालींवर हेलकावे घेत असे. त्याला हा आपला कटु अनुभव जणूं कोणाला तरी सांगावा असं सारखं वाटे,

संसारांत रममाण झालेल्या जून लोकांना तें सांगून कांहीं उपयोग होणार नाहीं; झाला तर तो निष्पाप बालकांच्या कोंवळ्या मनांवरच होईल, असं जणूं त्याला वाटे; नि म्हणूनच जणु काय त्यानें हा धंदा पत्करला होता...कीं, नकळे!

तो तोंडानें पेपेंरं वाजवून त्यांचं चित्त आकर्षी;...नि मुलांना फुगा देते वेळीं,

मनांत ' जगाच्या बाहिरंगावर भुलूं नका; त्याचा सर्व डौल पोकळ आहे; तो भ्रमाचा भोपळा या फुग्याप्रमाणेंच केव्हां फुटेल त्याचा नेम नाहीं !' असंच जणुं काय तो म्हणत असे.

म्हणूनच जणुं काय फुगा फुटल्यावर घाबरून परत आलेल्या मुलांकडे पाहून तो हंसे ! तो देत असलेली भिंगरी मुलांना जगाच्या दुसऱ्या अंगाची ओळख करून देण्याचा प्रयत्न करी !!

—५—

पण त्या बिचाऱ्या कोमल अंतःकरणाच्या कोंवळ्या पोरांना त्याची काय जाणीव असणार ?

आणि जख्खड म्हाताऱ्यांनासुद्धां आशा जिथं सोडीत नाहीं...तिथं ज्यांनीं जगांत नुकताच पाय टाकला आहे, अशा बालकांना तरी कां दोष ?




[ ३ ]

[ –चिनी कापडविक्या– ]

—१—

'एऽ चिनी, काय आहे रेऽ!' एखाद्या वात्रट पोराची चेष्टा...

त्यालाहि पूर्ण माहीत असतं तें ! तरी तो लागलीच तिथल्या तिथं थबकून हांत चित्तानें म्हणेल–'का ऽऽ पडू हायू ! लेस हायू !'

मराठीच्या असलेल्या मोडक्या ज्ञानाच्या उपयोग करून तो त्याला समजावण्याचा प्रयत्न करील !...

'कांहीं नको जा !'

आणखी मोठ्यानें ओरडा ना ! त्याला त्याचा कधींच राग येणार नाहीं ! नि पुन्हां तुम्ही 'थांब' म्हटलंत म्हणून तरी तो थांबणार आहे थोडाच ? याला पुरेसं काम आहे !

—२—

थंडी पडली—असतील तेवढ्या कपड्यांवर त्याचं भागतं !

सूर्य वर तळपत असला—धाम पुसून त्याचं काम पुढें चालूं होतं !!

त्याला विजेचे किंवा साधे पंखे लागत नाहींत; किंवा थंडीसाठीं पांघरायला कपडे अगर उबेला शेगडीही लागत नाहीं !

"एऽ चिनीऽ, इधर आव !" पांचव्या मजल्यावरून जरी त्याला कोणी हाक मारली तरी तो तेवढंच ओझं घेऊन वर जाईल !

सौदा पटला; फार चांगलं झालं; चार पैसे मिळाले ! श्रमाचं चीज झालं; आनंदी आनंद.

"चार आना वार देता है ?" "हां साब !" तो हिरमुसलं हसेल; लागलीच गाठोडं गुंडाळून खांकोटीस मारील; पांचही मजले उतरून पुन्हां

खालीं रस्त्यावरच्या गजबजींत येईल.

त्याची कधींच कुरकुर नसते! 'सौदा नाहीं पटला—कुच फिकिर नहीं—दुसऱ्या एखाद्या ठिकाणी पाहूं. पांच मजले चढल्याचा कांही खेद नाहीं!'

पाठीला ओझं बांधावं तेव्हांच पोटाचं ओझं कमी होतं!

—३—

दम लागला, पाय चालत नाहीं; फुटपाथची फरशी आहे;..पाठीचं ओझं काढून आसन केलं न् थोडा वेळ घाम पुसत आराम घेतला! बस्स! झालं...

त्याच वेळीं एखादा जोडीदार भेटला तर फारच चांगलं; आपल्या भाषेंत, आपल्या देशाच्या चार गप्पा मारल्या, कीं, शरिराला व मनाला आनंदीआनंद झाला. श्रम घालवयाला 'पिक् मी अप्'च प्यावं लागतं असं नाहीं! चार साध्यासुध्या गप्पांनंतर पुन्हां गाठोडं खाकेंत मारायला तयार स्वारी!

मग पुन्हां सुरुं 'लेऽस तरेवाऽर...काऽ ऽ ऽ पृ ड्‌ हाऽय्'

सकाळपासून चालून चालून दमला! जातांना संध्याकाळीं आण्याचं ट्राम-तिकिट काढायला हरकत नाहीं. विडी ओढण्याच्या बांकावर बसून 'पाईप' फुकायलाही कमी करण्याचं कारण नाहीं!

श्रमानंतर विश्रांति नको? गाठीं पैसे असल्यावर शोक नको!...

—४—

कुठं चालला बरं हा? आपल्या घरीं! कुठंसं आहे याचं घर?...

आहे आपल्या ऐपतीप्रमाणं एखाद्या कोपऱ्यांत! काय करायचंय आपल्याला? कशाला नसत्या चौकशा??...

पण,...पण...काय जबर उद्योग? केवढी चिकाटी!

कुठं चीन न् हिंदुस्थान! त्याचा दक्षिणभाग—पण तरी हा चिनी इथं!...

कां बरं? कशासाठीं ही अफाट खटपट??...

तें निराळं सांगावयासच का पाहिजे?...

आशा!...महान् आशा!!...

~~~~~~~~



# [४] याकूब [व्हिक्टोरिआवाला-]

—१—

"चल!.. चल बेटा!" हातातील लगाम घोड्याच्या पाठीवर हलकेच आपटत याकूब म्हणाला. घोड्याला तेवढा इशारा नेहमीच्या सवयीमुळें पुरेसा होता. तो हळूहळू दुडक्या चालीनें धांवत निघाला.

गरगर फिरणाऱ्या रबरी चाकांचा अस्पष्ट आवाज, ठेक्यांत पडणाऱ्या घोड्याच्या पावलांच्या आवाजांत ऐकूं येत नव्हता. मधून मधून घोड्याचं फुरफुरणं, पुढील फळीवर आपटल्या जाणाऱ्या चाबकाच्या दांड्याचा 'खाट् खाट्' आवाज, याशिवाय इतक्या पहांटेस त्या अगदीं एका बाजूच्या गल्लीत दुसरा कसला आवाज ऐकूं येणार?

"अभी तो बहुत नजीक है, बेटा, स्टेशन!" याकूब म्हणाला. जणूं काय त्या घोड्याला याची सर्व भाषा समजत होती. पण समजल्याप्रमाणेंच तो घोडाही त्याच वेळीं फुरफुरला. त्यानें चार पावलं जोरांत टाकलीं.

—२—

बराच वेळ चालल्यावर एकदांचं स्टेशन आलं. त्यानें इकडे तिकडे पाहून गाडी एके ठिकाणी उभी केली. त्यावेळीं तिथं कोणी पोलीस नव्हता; त्यामुळें त्याला कसला त्रास झाला नाहीं.

पण तोच दिवस असता तर? "एऽऽ व्हिटोरिआऽ! इधर नहिं खडी करना!...चलोऽ हकालोऽ!"
~~~~~~~~

दंडाच्या भीतीनं त्या पिवळ्या पगडीपुढं मान वांकवणं भाग पडलं असतं याकूबला. अशावेळीं!—

सकाळी ४॥। ला एक लांबची गाडी यायची होती. त्यावेळीं भाडं मिळेल ही त्याची आशा! पण अजून गाडीला पाऊणएक तास अवकाश होता.

लगाम सैल सोडून चाबूक हातांत घेऊन तो आपल्या जागेवरच बसून राहिला. बसल्या बसल्या त्याला डुलकी आली. त्याची मान पुढच्या बाजूस व आजूबाजूला घड्याळाच्या लंबकाप्रमाणें झोंके घेऊं लागली.

आपला मालक झोपला आहे. असं पाहुनच जणुं काय, घोडाही उभ्या-उभ्या डोळे बंद करून डुलक्या घेऊं लागला.

—३—

दुसऱ्याच कोणा लोकल गाडीच्या हालचालीचे सूचक आवाज त्याच्या झोंपी गेलेल्या कानांत शिरले.

याकूब खडबडून जागा झाला. घोडाही मोठ्यानें फुरफुरला!

तोंच 'घोऽऽ' आवाज करीत ती लांबची गाडी एकदांची स्टेशनांत शिरली. उतारू भरभर उतरूं लागले. हमालांची ये–जा सुरूं झाला. एक एक हमाल आपल्या 'शेट'च्या बरोबर बाहेर पडत होता.

'व्हिटोरिआऽ साबऽ' याकूब विचारूं लागला. त्याच्या पोटांत कालवा-कालव होत होती–'भाडं मिळेल? लांबचं का जवळचं? सौदा ठरेल का पण?'

चाबकाचा शेंडा वर करीत, प्रत्येक उतारूकडे पहात तो 'शेऽट!' असं आदबीनें म्हणत होता.

वेळीं 'शेट' कोण होईल हें सांगतां येत नव्हतं. त्यामुळें प्रत्येकाला तो खूष ठेवीत होता. साहेब लोक बहुतेक मोटारीतून जाणार! त्यांची आशा करण्याचं त्याला कारण नव्हतं! गावठी साहेबांवरच त्याची सर्व भिस्त! त्यानें बऱ्याच लोकांना विचारलं; पण त्याला कोणी गिऱ्हाईक मिळालं नाहीं.



दुसरी लांबची गाडी आतां सहाला! पुष्कळच अवकाश होता. त्याला अतिशय झोंप आली. आंतल्या गादीवर हात पाय पसरून त्यानें ताणून दिलं.

—४—

तो किती वेळ झोंपला होता, कोण जाणें! पण जागा झाला त्या वेळीं त्याला कोणी तरी हालवीत होता.

"ए व्हिटोरिआऽ!" त्याबरोबरच कानठळी बसविणारी मालगाडाची शीळ त्याच्या कानीं पडली. तो झटकन् उठून बसला.

"कुलबा आता है क्या?" त्याच्या समोरील बूटपँटवाला म्हणाला.

"हां हां साब! क्यंऊं नहीं?"

"क्या लेएगा! एक बात बोलो?"

"देढ रुपया साब!" लोकांची रोजची घासाघासीची पद्धत ठाऊक होती त्याला!—

शेवटीं, चौदा आण्याला ठरलं!–'चला! भवानी तर झाली!'

हमालानें सामान भरलं. घोडा चालूं लागला, याकूबनें विडी पेटविली.

—५—

धुराचे फवारे सोडीत तो घोड्याला मधून मधून चुचकारत होता.

यंत्राप्रमाणें तो वळणावर, नाक्यावर गाडी संभाळून नेत होता. मागून ट्रॅम आली कीं तिचा खणखणाट ऐकून रुळावरून बाजूस होणं, मोटारीला रस्ता करून देणं,..सर्व क्रिया त्याच्या हातून आपोआपच होत होत्या.

त्याच्या नेहमींच्या अनुभवाप्रमाणेंच त्याला थोडंसं जास्त अंतर व अधिक गल्ल्या धुंडाळाव्या लागल्या. चौदा आणे चुकते झाले!...

त्यानें थोडा वेळ परत येतेवेळचं भाडं मिळण्याची वाट पाहिली, पण जमलं नाहीं. त्या अवधींत त्यानें घोड्याचं गवतानें व स्वतःचं चहानें पोट भरलं.

चहामुळें जरा हुरूप आला; तसं घोड्याला थोपटून, त्याचं अंग थोडावेळ मळून त्यानें पुन्हां लगाम हातीं घेतली. घोडा चालूं लागला—

—६—

सूर्य आतां वर आला होता.

जिकडे तिकडे माणसांची गडबड घाई सुरू झाली होती. ट्रामचा खण-खणाट व तारेवरून घसरणाऱ्या दांड्याचा 'सऽऽऽ–' असा चमत्कारिक आवाज मोटारींचे 'पॉंक पॉंक' व विजेच्या शिंगाचा 'भ्रींऽऽ' आवाज !...

शहर पुन्हां जागृत झाल्याचीं सर्व चिन्हं दिसत होतीं.

याकूब लगामीला एक लहानसा हिसका देऊन आपलं हृद्गत घोड्याला तारायंत्राप्रमाणें कळवीत होता.

पुन्हां बोरीबंदर आलं. घोड्याला व त्याला थोडासा विसांवा मिळाला. पण तो विसाव्यासाठीं तेथें थांबला नव्हता. त्याला एखादं नवं भाडं मिळाल्यास पाहिजे होतं.

—७—

नऊ वाजून गेले होते. साडेनवाच्या गाडीला एखादा 'पासिंदर' मिळाल्यास पहावा म्हणून तो तिथं थोडा वेळ थांबला.

गाडी आली. माणसं बाहेर पडूं लागलीं. त्यानें पुष्कळांना विचारलं. पण कोणी 'शेट' मिळाला नाहीं.

आतां त्याला कोणाची एवढी पर्वा नव्हती; तो थोडासा रागावलाही होता.

आतांपर्यंत प्रत्येकाला आशेनें, आदबीनें विचारणाऱ्या याकूबानें 'कां पांडुतात्या, यायचं का ?" म्हणून हंसत हंसत एका पोरगेल्या माणसाला, 'टर उडविण्याच्या हेतूनें' विचारलं. त्याला 'कसला येतो तो ?' असंच वाटत होतं.



पण लगेच त्याला वाटलं, 'तो खरोखर आला तर ?'—म्हणून तो अधिक कांहीं बोलला नाहीं.

पण तो पुढेंच निघून गेला. त्याच्याविषयीं पुरा निराश झाल्यावर थोडसं स्वताशीं व थोडं त्याला ऐकूं जाईल या बेतानें हसून याकूब म्हणाला–'पैसे न्हाईंत का खिशामंदी ?'

'कशी केली टर ?' असं वाटून त्याला प्रथम आनंदहि झाला.

पण तो तेवढ्या पुरताच; त्यापासून त्याला कोणता फायदा ?

तिथं आणखी उभं राहून त्याला भाडं मिळण्यासारखं नव्हतं. लांब दिसणाऱ्या ट्रॅम स्टँडजवळ मात्र बरीच गर्दी दिसली. त्यानें लगाम खेंचून आपला मोर्चा तिकडे वळवला.

—८—

चाबूक वर करून 'शेटसाब, गाडी !' म्हणून ओरडून व खुणावून सांगत तो जवळ जाऊन उभा राहिला. ट्रॅम मागून ट्रॅम जात होती. प्रत्येक वेळीं लोक उत्सुकतेनें पुढें जात. प्रथम 'दरवाजा'च बंद दिसे. पण कांहीं सांखळी वर करून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत. इतक्यांत, कंडक्टर मागं येऊन 'जग्या नहि !...पिछे गाडीसे आव !' म्हणून ओरडूं लागे. बिचारे खालीं उतरत. निराश होऊन दुसऱ्या ट्रॅमची वाट पहात.

हीच याकूबची सुसंधि ! 'शेऽऽट' ! त्याच्या दृष्टीनें, आपल्या गाडींत बसण्यासारखा पगडीवाला फेटेवाला शोधून, त्याला तो म्हणे 'शेऽट ?'

व्हिटोरिआंतून जावेसं प्रत्येकाला वाटे. पण एक आणा व व्हिटोरिआचं भाडं यांतील अंतर होतां होई तों कमी करण्याच्या मनुष्य-स्वभावामुळें याकूबचा सौदा कधींच पटत नसे.

असं दोन तीन वेळां होऊन एकदांच्या भरपूर जागेच्या ट्रॅमगाड्या भराभर येऊन, एक दोन गाड्यातून गर्दी साफ निघून गेली.

याकूब बापडा गाडीघोड्यासकट ट्रॅमगाडीला नि साऱ्या जगाला मनांत शिव्या देत तिथंच राहिला.

—९—

अकरा वाजून गेले. सकाळीं झालेल्या 'भवानी'नंतर त्याला अजून कांहींच भाडं मिळालं नव्हतं. त्याला कांहीं सुचेना. तो बेचैन झाला.

त्यानें लगाम हातीं घेतली. घोडा टपूटपू पावलं टाकीत चालूं लागला. वाटेंत त्याला एक मुसलमानी हॉटेल लागलं. 'एऽऽ चायू लाव एक !' त्यानें लगाम खेंचून हॉटेलच्या पोऱ्याला ओरडून सांगितलं. चहाचा कप तोंडाला लावीत तो इकडे तिकडे पाहात होता.

बाजूला एक इसम हातांत बॅग घेऊन उभा असलेला दिसला. याकूबनें भरभर चहा घशाखालीं घालून पोऱ्याच्या हातांत एक आणा टाकला. नि तो आशेनें त्या गृहस्थाकडे धांवला–'गाडी मंगता है शेट ?'

'अरे नहिं !' 'शेट' आपल्याच विचारांत असल्यामुळें त्याच्यावर ओरडला.

...याकूबची पूर्ण निराशा झाली.

आतां त्याच्याकडे सकाळीं मिळालेल्या चौदा आण्यापैकीं अकरा आणेच शिल्लक राहिले होते. दोन आणे चहाला, एक दिडकी विडीला व तीन दिडक्यांच्या तीन पानपट्ट्या.

त्याचं, घोड्याचं, बायकोचं व दोन पोरांचं कसं होणार तेवढ्यांत ? अजून त्याला एखादं नवं भाडं मिळालं तर हवं होतं.

साडेबारा वाजून गेले. त्याला भूक लागूं लागली. शेवटीं त्यानें आपल्या घराकडेच गाडी फिरविली.

जातां जातां चार आण्याचा घोड्याला दाणा घेण्यास तो विसरला नाहीं.

घरीं हमीदा नवऱ्याची वाट पहात होती.



—१०—

त्यानें आपली मळलेली तांबडी टोपी काढली. खाकी कोट घामानें बराच भिजला होता. मधून मधून फाटलेल्या जागेंतून त्याचें घामानें ओलंचिंब झालेलं काळं अंग दिसत होतं.

विजार काढून तो लुगड्यासारखं आडव्या उभ्या पट्ट्याचं रंगीत 'धोतर' नेसला. नळाखालीं आंघोळ करून तो घरांत आला.

आज शुक्रवार होता. मशिदींत जाऊन तो निमाज पढून आला.

मुलं बाहेर खेळत होतीं. घोड्याला पाणी पाजून त्याला दाणा व गवत चारून तो जेवायला बसला. बरोबर मुलांनाही त्यानें घेतलं होतं. समोर आलेलं साधंसुधं जेवण त्यानें हां हां म्हणतां खलास केलं.

अडीच तीनचा सुमार होतांच, राहिलेले सात आणे बायकोच्या हवालीं करून त्यानें कपडे चढवले. घोड्याला बाहेर काढून त्यानें खोगीर चढवलं. गाडी जुंपून थोडंसं गवत खालच्या गोणपाटाच्या पिशवींत कोंबलं. लगाम हातीं घेऊन तो आपल्या घोड्यासह पुन्हां बाहेर पडला.

घोडा त्याचा एकपरीनें सदा जवळ असणारा त्याला सर्व अडचणींतून निभावून नेणारा मित्रच !...

—११—

आतां संध्याकाळ झाली होती. भाडं मिळायचीं ठिकाणं कालमानाप्रमाणें बदलतात. याकूब एका मोठ्या सिनेमागृहासमोर जाऊन उभा राहिला.

त्यानें बराच वेळ वाट पाहिली. सात वाजले होते. आतां थोड्याच वेळांत सिनेमा सुटणार म्हणून तो उत्कंठित अंतःकरणानें तिकडे पहात होता.

झालं ! सुटला एकदांचा सिनेमा. एक 'शेट' पुढें आले. हो-ना करतांना त्याला रुपयाचं भाडं मिळालं. त्यानें गाडी तिकडे हांकली.

तोंच...आकाशांत ढग जमूं लागले...मधून मधून चमकणारी वीज, विजेच्या दिव्यांना लाजवूं लागली;...थोड्याच वेळांत पाऊस पडणार अशीं चिन्हं दिसत होतीं.

याकूबला आनंद वाटला. त्याच्याही डोक्यांत एक आनंदी विचार विजेसारखा चमकून गेला. आकाशांतील ढगाप्रमाणेंच त्याच्या अंतःकरणांत आशा निराशेचा गडगडाट होत होता.

आणि थोड्याच वेळांत जोरानें पाऊस पडूं लागला. बऱ्याच 'अछत्र' चालणाऱ्या लोकांची त्रेधा उडाली. याकूबला वाटलं 'आली !-पर्वणी आली !' ह्या सोन्यासारख्या संधीचीच तो मघांपासून वाट पहात होता.

त्यांतच ट्रामच्या तारा नादुरुस्त झाल्या. याकूबचा आनंद गगनांत मावेना!- आतां त्याला भाडं मिळणार होतंच; पण सौदा पटवून लोकांचं चालणार नव्हतं. तो सांगेल ती किंमत द्यावी लागणार होती.

आतां त्याच्यापेक्षां लोकांनाच जास्त गरज होती. वारं उलटं फिरलं होतं!..

–१२–

छत्री संभाळीत एक पगडीवाले पुढें होऊन हिंदी बोलूं लागले—' परेलकु आता है क्या ? '

" हां साब ! दो रुपया ! "

" नही !...फक्त देड रुपया देएंगा ! "

" नहि नही ! हम् एकहि बात बोलता हैं ! "

" अच्छा चलो ! काय करणार ? अडला हरि–"

' आतां कसं भाडं झटकन मिळालं ? ' त्यानें घोड्याला चाबूक हाणला.

विजा कडाडत होत्या. पाऊन पडून त्याला ओलाचिंब करीत होता. त्याची याकूबला फारशी काळजी वाटली नाहीं. त्यानें भिजत भिजतच आंतील 'ताल्या'-ना त्यांच्या घरीं नेऊन पोहोंचविलं. त्याच्या हातीं तीन रुपये पडले.



आतां याकूब श्रीमंत झाला होता. त्याच्याकडे आतां चार रुपये होते. तेव्हां क्षणभर त्याच्या डोक्यांत नाना वेडेवांकडे विचारहि खेळूं लागले...पण...

पण काय उपयोग ? आठ केव्हांच वाजून गेले होते...पुन्हां आज तर मुंबईतला 'सुका' दिवस...त्याचा अगदीं नाइलाज होता...

तरी पण त्याच्या अंतश्चक्षूंता त्या झिमूझिम् पडणाऱ्या पावसाच्या सरींमधून तो भूतकाळचा चिरपरिचित असा दूरचा लालहिरवा दिवा अंधुक अंधुक दिसूं लागला. पण...अखेर मनावर ताबा मिळवून त्यानें घोड्याला फिरून चाबूक हाणला व घराकडेच वळला.

–१३–

अशावेळीं, पूर्वींच्याकाळीं मात्र, दौड करीत तो तीनचार मिनिटांत त्या ठिकाणीं पोहोचे. दुकान थोड्याच वेळांत बंद व्हायचं असलं तरी तो आंत प्रवेश करी; तिथल्या पिंपाजवळचा पारशी ग्लास भरून त्याच्या हातीं देई.—पहिल्या दोन चार ग्लासांनंतर आपण किती प्यालों व किती पैसे खर्च झाले याचं त्याला धोरण–ध्यान मुळींच रहात नसे.—शेवटीं, नऊ वाजतां दुकान बंद होतांच त्याला नाइलाजानें बाहेर यावं लागे. घोडे पडत पडतच तो आपल्या जागेवर चढे. लगाम हातांत घेतांच त्याचा घोडाहि चालूं लागे...

मग त्याच्या सभोंवारचं सारं जग गरगर फिरूं लागे. तरी पण तो गाडी-घोड्याला घेऊन नीट सरळ रस्त्यानेंच चाले. किंवा...त्याचा तो घोडाच आपण होऊन याकूबला घेऊन घरचा रस्ता कांटीत असे...

ते क्षण...अहाहा...याकूब त्याच्या जिवाचा राजा असे. जिकडे तिकडे आनंदी आनंद !...त्याच्या मनावरील आशानिराशेचं प्राबल्य निदान त्यावेळेपुरतं तरी नाहींस झालेलं असे !...बेफिकीर...पूर्ण बेफिकीर ! !...

त्याला जगाची तमा नसे...मग पुन्हां जेव्हां येई तेव्हां येई शुद्धीवर...... पण शुद्धीवर आल्यावर मग ?...मग काय ?...पुन्हां आशा...पुन्हां निराशा...

—तसाच तो कायमचा चक्रनेमिक्रम ! !...

—१४—

—पण गेले....ते एक प्रकारच्या न्यान्या भुलभुलावणीच्या सुखाचे दिवस कायमचे गेले !...

...तरी पण...हे आजचे नवे दिवसहि कांहीं कमी सुखाचे नव्हते !... कारण,...आजचे त्याच्या खिशांतील ते खुळखुळणारे चार रुपये सगळे-च्या सगळे त्याच्याबरोबरच त्याच्या घरीं...हमीदेकडे जाऊन पोचणार होते!-

त्यामुळेंच कधींमधींचं पोराबाळांचं गोडधोड, कधीं त्यांच्या अंगाखांद्या-वरचे चांगले कपडे...हें त्याला पाहायला मिळे.

तसल्या मिश्र भावनांचा एक दीर्घ विश्वास टाकून याकूबनें खिशांतून ' हिरवाधागा ' काढून शिलगावली. स्वतःशींच एक सूक्ष्म स्मित केलं

—नि घोड्याला हळूच चाबूक मारून घराकडे लौकर लौकर चालण्याचा इशारा केलं...

टप् – टप् – टप् – टप्......



[५]

# तुलसीदास [ट्रामड्रायव्हर]

—१—

' एकसो पचीऽस !... '

इन्स्पेक्टरच्या तोंडांचे शद्ब ऐकतांच तुळसीदास भराभर पावलं टाकीत आपल्या ट्रमकडे धांवत आला. येतां येतां त्यानें एका हातांतील भेळीची पुडी आपल्या खिशांत कोंबली व उजव्या हातांतील पानपट्टी ( मधलं बोट नि आंगठा यांमध्यें धरून ) तोंडांत भरीत, अस्पष्ट आवाजांत म्हटलं 'हांऽ साब !'

अंगाला एक हिसका देऊन 'खट्र्रर'...करीत त्यानें उजव्या हातांतील दांडा गरकन् फिरवला; ब्रेक सोडले व डाव्या हातानें विजेचा प्रवाह सुरूं केला. त्याची गाडी पुन्हां सुरूं झाली.

विरुद्ध दिशांना गाडया घेऊन जाणाऱ्या दोन रुळांतील अंतर दृष्टीला अगदीं थोडं; परंतु आजपयर्तच्या अनुभवानें त्याला एवढं ठाऊक होतं, कीं पुन्हां सर्व 'दादरतक' गिरकी मारल्याशिवाय त्याला म्युझिअमकडे येतां येणं शक्य नव्हतं.

त्यानें उजव्या हाताच्या बोटावर घेतलेल्या चुन्यांतलि बचासचा भाग जिभेवर व दांतांवर लावून सबंध पट्टी दोनतीनदां चघळून पिचकन् पिंग टाकली; नि उरलेला ट्रामच्या एका फटींत पुसला. एंजिनमध्यें कोळसा भरल्यासारखं झालं;...त्याची ट्राम भरामर जाऊं लागली.

सांधा देणाऱ्या पोऱ्यानें पुढच्या ट्रामचा सांधा अजून बदलला नव्हता. तुळसीदास आपल्याच विचारांत गढलेला असल्यामुळें ट्राम अगदीं जवळ येईपर्यंत त्याच्या तें लक्षांत आलं नाहीं.

'एऽ साला !' म्हणून तोंडानें शिवी हांसडीत त्यानें ट्राम जेमतेम थांबावली! पोऱ्यानेंहि त्याच्याकडे मोठे डोळे करीत सांधा बदलला; पण लागलीच त्याला अपशद्ब बोलल्याचं तुलसीदासाला वाईटहि वाटलं.

दोघेही नोकरच ! दोघांच्याही पाठीमागें सारखीच कामं !! दोघांच्याहि पाठीमागें सारखींच पोटं !-सारखीच दगदग...

—२—

आतां त्याची ट्राम भराभर स्टँड मागून स्टँड टाकीत पुढं चालली होती. प्रत्येक ठिकाणीं किती लोक चढत होते, किती उतरत होते; पण तुळसीदास बिचारा जागच्या जागींच आळीपाळीनें ट्राम उभी व चालू करीत उभा होता.

भर रस्त्यांतून तो जात होता; पण त्यावर पाय टाकायची त्याची प्राज्ञा नव्हती. भर गर्दींतून तो जात होता; पण तो एखाद्या निर्जन अरण्यांत जखडून टाकल्यासारखा होता.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या बँकांत पैशाच्या घडोमोडी चालल्या होत्या; पण तुळसीदासाचा हात चक्राशीं खिळून राहिला होता. हॉटेलांत लोक 'चाय' पितांना दिसत होते; पण त्याला चहा प्यावयास खालीं उतरतां येणं अशक्य.

ट्राममध्येंही बरेच लोक बसले होते. त्यांतले कांहीं फिरावयाला जात होते; कांहींना कामं साधावयाचीं होतीं; कांहींना गाडी पकडायची होती; कांहीं करमणुकीसाठीं सिनेमाचे 'शो' पहावयास जात होते.

त्या सर्वांना तो आपापल्या कामांत मदत करणार होता; पण तो स्वतः मात्र स्थिर होता.

—३—

नि हेच विचार नेहमीं तुळसीदासच्या मनाला त्रास देत !



कामगिरीवरून संध्याकाळीं ८॥ वाजतां सुटका होणार होती; त्याला भूक तर सपाटून लागली होती.

घराची आठवण होतांच बोरीबंदरपासून धोबीतलावपर्यंत त्यानें ट्रामबरोबरच आपलं मनही स्वैर सोडलं. त्याच्या मनांत पुष्कळ विचार येऊं लागले. 'बायको !- मुलं !......पण छे...नकोत ते विचार...आपलं कर्तव्यकर्म राहावयाचं बाजूला; एखादा आक्सिडेन् व्हायचा !'

या विचारानेंच जणूं काय,...त्यानें धोबीतलावाजवळ ट्रामला व आपल्या विचारांनाहीं खीळ घातली.

'चार मिनट देर काय कू ?' स्टार्टरनें त्याला आपल्या हातांतील टाईमशीटकडे पहात विचारलं. फोनवरची ती बिनचुक माहिती होती त्याची...

'बहुत गर्दी थी साब!'...तो म्हणाला व कंडक्टरनेंहि त्याला दुजोरा दिला. इन्स्पेक्टरनें थोडंसं गुरगुरतच शिट्टी फुंकली.

तोही नोकरच; पण नोकर एकमेक एकमेकांना ओळखत नसतात जगांत !

असे किती तरी प्रसंग आले असल्यामुळें तुलसीदासलाही असल्या गुर्मीची सवय झाली होती. त्याची ट्राम पुढं सुरूं झाली.

—४—

त्याच्या मनांत कितीतरी निरनिराळे विचार येत जात होते. बिचाऱ्यांना सुट्टी म्हणजे काय चीज असते, तें समजतसुद्धां नाहीं. सुट्टी बड्या लोकांकरतांच असते. मग ओळखीच्या लोकांना भेटावयाला त्याला कुठला वेळ मिळणार ? त्याचे कांहीं कांहीं नातलग दुसरी ट्राम घेऊन विरुद्ध दिशेनें येत; त्या वेळीं एकमेकांत 'रामराम' होत असेल तेवढाच ! त्या वेळचं त्याचं तें हास्यमुख फिरुन दिसण्याचा किंवा तो एखादा अस्पष्ट शद्ब पुन्हां ऐकण्याचा केव्हां प्रसंग येईल, तें नक्की सांगणं कठीण !

ट्राम परत फिरली. तोच कंटाळवाणा प्रवास पुन्हां सुरू करण्यापूर्वी त्यानें खिशांतील भेळ भराभर बोकणली व नवी पट्टी आणि चुना यांनीं आपला तोबरा भरून घेतला. तोंपर्यंत चारपांच मिनिटं होऊन त्याला परत निघावं लागलंच.

जातेवेळीं प्रमाणेंच येतांनाहि सर्व पूर्वीप्रमाणेंच चाललं होतं.

—५—

'अरेऽ! अरेऽ! क्या करता है!!' असं म्हणतां म्हणतां शेवटीं त्याची ट्राम त्या मोटारीवर आपटलीच. तरी त्यानें विजेचा ब्रेक लावला म्हणून बरं;...नाहीं तर त्या मोटारचा चुराडाच व्हावयाचा!...

लोक भराभर उतरून जाऊं लागले. 'साब साब' करीत त्यानें दोघां चौघांची साक्षीसाठीं गयावया केली; परंतु प्रत्येकजण जबाबदारींतून पळत सुटला.

खरं पहातां चूक त्या मोटरवाल्याचीं होती. तुलसीदास ज्या रस्त्यानें जात होता त्याची डागडुजी चालली होती. कांहीं भाग खणून ठेवला होता. मोटरवाले दोघे युरोपिअन असल्यामुळें व त्यांनीं बरीचशी 'ठांसली' असल्यामुळें त्यांना काळोखांत तें बरोबर दिसलं नाहीं. ते जोरानें दुसऱ्या बाजूस निघून जात असतां खड्डयांत अडकून पडले; नि तुलसीदासाची ट्राम त्यांच्यावर...

नशीब त्यांचं! त्यांना कोणाला फारसं लागलं नाहीं.

ते मेले असते तर बोललेच नसते; पण जिवंत असल्यामुळें आतां त्यांना जोर येऊन सर्व प्रकारची जबाबदारी ते तुलसीदासवरच ढकलूं लागले होते.

—६—

प्रवाहपतित तुलसीदास! त्याला असले कटु अनुभव पुष्कळ वेळा आले होते. त्याला साक्षिदार कोणीच मिळेना. प्रत्येकानें पाहिलं होतं पण



जबाबदारी नि दगदग म्हटली कीं आमच्या लोकांच्या कपाळाला आंठ्या पडतात. 'उगीच कशाला नसतं झेंगट!' तरीपण बऱ्याच वेळानें याला एक दयाळू इसम साक्षिदार मिळाला; त्याची ट्राम पुढं चालू झाली.

तुलसी बिचारा गरीब होता; तरी असल्याच लोकांच्या चुकांबद्दल त्याला दोनतीन वेळां दंड झाला होता. त्यांतून युरोपिअनांच्या विरुद्ध म्हणजे हटकून अपयश!...

म्हणूनच तो मनांत फार चरकला होता. त्या गडबडींत त्याचा वेळ तर जास्त गेलाच; ट्राम लयनीवर 'ओरटाइमा'ला किंमत नसते. सारा आणेपैचा मामला तो! पण एक नवी चिंता मात्र उराशीं लागली.

नेहमीं असंच चाले. पण त्रासाशिवाय काय मिळणार?

आणि म्हणूनच,...याला जगांत रहाण्याचं साधन मिळविण्यासाठीं, गजबजलेल्या जगांत असूनही, जगांत नसल्यासारखंच रहावं लागत होतं!!

दिवसामागून दिवस,...वर्षामागून वर्ष...नि असंच सारं आयुष्य!...




# [६]

# [-शिपाई-]

-१-

म्हातारा होता बाकी जरा गमतीच !...

होती वामनमूर्तीच ! पण सरकारनें त्याला दिलेलीं आभरणं त्याला खुलून दिसत असत. तें तांबडं झोंकदार पागोटं, पांढरा शुभ्र अंगरखा, पायांत पांढरी पाटलोण, कंबरेला गुंडाळलेलं उपरणं ! या सर्व इतमामावर त्याच्या छातीवर रुळणारा तांबडया बनातीवरील हवालदार म्हणून लिहिलेला इंग्रजी बिल्ला जास्तच प्रामुख्यानें दिसे.

गणपूचे केस जरी रुपेरी झाले होते तरी त्याचा चेहरा साधारण वाटोळासा असल्यामुळें डोक्यावरील पगडीनें तो जास्त गंभीरच दिसे. तो कॉलेजच्या व्हरांड्यांतून डुलत डुलत चालूं लागला म्हणजे त्याच्या कानांतील ( पितळेच्या का सोन्याच्या ) बाळ्या लुडलुड हलत असत.

नेहमी चालतानां तो उजव्या हातानें आपला पट्टा ओढी व डाव्या हाताच्या आंगठ्यानें डाव्या खांद्यावरून खालीं सरकणारा भाग खांद्याच्या बाजूला वर ढकली. मधून मधून तो आपल्या बिल्ल्यावरून कोटाची बाही फिरवून तो साफ करी.

इतक्या वारंवार त्यावरून हात फिरविण्याची वास्तविक कांहीं गरज नव्हती. पण ती त्याला संवयच लागून गेली होती. ती इतकी कीं, प्रिं. साहेबानें हांक



मारली रे मारली कीं तो दोन हातांनीं आपल्या डोक्यावरील पागोटं वरखालीं करी व नंतर छातीवरच्या बिल्ल्याकडे पहात तो साफ करीत करीतच धांवे.

-२-

कॉलेज चालू असतांना त्याचं दर्शन म्हणजे आम्हांला देव-दर्शनच वाटे.

प्रोफेसरांची बडबड तासाच्या शेवटाशेवटाला फार असह्य होत असे. अशा वेळीं आम्ही गणपूची मोठ्या आशाळभूतपणें मार्गप्रतिक्षा करावी. नि त्यानेंही बिचाऱ्यानें आमचा पाठीराखा होऊन आमच्या कैवारासाठीं धांवत यावं.

कांहीं वेळां तो ठरलेल्या वेळेच्या आधींच येई. त्यावेळीं आनंद होई.

पण कांहीं वेळां 'कां मनि धरिली अढी ?' असा प्रश्न विचारावासा वाटे.

त्याच्या हातांतील लोखंडाचा रूळ आमच्या मनांत किती नवनवीन लाटा उठवून देई. त्यानें केलेला ' ठण्, ठण, ठण, ठण, ठण, ' असा आवाज आमच्या आशाळभूत कानांना किती मधुर वाटत असे.

एकदां तें त्याचं काम झालं कीं, तो पुन्हां तासभर येत नसे. दर तासाशेवटीं तो असं एकदांचं देव-दर्शन देई.

मधल्या दहा मिनिटांच्या सुट्टींत प्रत्येक प्रोफेसराकडून तो हजेरीचे कागद जमवी. ( त्यावेळीं त्याच्याकडे संधान बांधल्यास बहुतेक गैरहजरांच्या हजेरीचं काम होई. )

कॉलेजच्या मासिकाच्या दोनचार प्रती मारावयास त्याची मदत लागे. आणि तसा तो 'सरळ' असल्यामुळें कोणाच्याहि हमखास उपयोगीं पडे.

-३-

मात्र याचा वचपा पोस्ताच्या वेळीं तो पूर्णपणें काढी. तो प्रत्येक बाबतींत 'मनुष्य पाहून' काम करी. आणि त्याला या कामीं इतक्या वर्षांचा अनुभव फार उपयोगी पडे.

प्रिंन्सिपॉलकडे भेट घ्यावयास सोडतांना, कॅलेंडरं, हॅंडबुकं पहायास देतेवेळीं किंवा वर्षांअखेर जुन्या प्रश्नपात्रिका वाटतेवेळीं तो या तऱ्हेची निवड फार उत्तम तऱ्हेनें करी.

मारवाडी लोकांची व्याजाच्या वेळीं महिने मोजायची पद्धत व गणपूची पोस्तासाठीं सण मोजायची पद्धत जवळजवळ सारखीच होती. शिमग्याआधीं पुष्कळ वेळां 'शिमगापोस्त' दिलं असतांनाही सुट्टीनंतर तो होळीचं पोस्त मागावयास कमी करीत नसे.

असल्या कामांत मात्र पक्षपात न करितां प्रत्येकाजवळ तो सारखीच मागणी करी!...आणि त्याच्या सर्वांगीण सामर्थ्याची साऱ्यांनाच जाणीव असे.

—४—

"कायरे गणपू, तूं शिकलाहेस कितीसा रे?" असं त्याला जर चेष्टेनें विचारलं,...तर तोही तेवढ्याच गंमतीत सांगे—"साहेब, किती कां शिकलेलों असेना! तुम्हाला काय त्याचं? तुमच्याबरोबर आज कॉलेजांत तर आहें ना? बस्स तर मग!"

आणि मग त्याच्या 'हाताखालून' गेलेल्या मोठमोठ्या लोकांची नांवं घेऊन त्यांच्या बारीकसारीक गोष्टीं तो रंगवून सांगूं लागे. त्यांत ज्यांनीं ज्यांनी त्याला वेळोवेळीं पोस्त दिलं होतं, त्यांचे तो जास्त गोडवे गाई; नि अप्रत्यक्ष-पणें आम्हाला वर्तमानकाळांत लाजवी!—

मुलाप्रमाणेंच जुन्या प्रिन्सिपॉल—लोकांचा तो इतिहास घडाघड सांगे. सुरवातीसुरवातीला त्याला कांहीं कोहीं इंग्लिश साहेबांनीं लाथा कशा मारल्या होत्या, पण लागलीच संध्याकाळीं थंड झाल्यावर एकदम खूष होऊन पांच रुपयांची नोटहि कशी अंगावर फेकली होती, वगैरे गोष्टी मोठ्यानें हंसत हंसत खुलवून सांगण्यास तो सदा तयार असे. कारण त्यांत त्याचा मोठेपणा होता; वर्तमानकालीन स्वार्थहि होता!—



पण त्याच्याइतका प्रत्येकाला तें सारं ऐकायला वेळ असेच असं नव्हे.

कॉलेजमधील अमकी वस्तू केव्हां खरेदी केली, अमके टेनीस कोर्ट केव्हा तयार झालं, क्रिकेट ग्राउंडवर कुठं कुठं झाडं होतीं, वगैरे बऱ्याच गोष्टी तो विचारल्याशिवाय सांगत असे. जबर त्याची स्मरणशक्ति,...नि...चर्पटपंजरी...

पण या सर्वांपेक्षां तो वेळच्या वेळीं (किंवा थोडीशी आधीं) घंटा वाजवीत असे म्हणूनच आम्हांला फार आवडे. ती त्याची कर्तुमकर्तुम् शक्ति अजब नि प्रभावी होती!—

—५—

गणपूनें 'कॉलेज-प्रवेश' केला त्या सुमारास त्याला झालेला मुलगा आतां चांगला बावीसतेवीस वर्षांचा झालेला....

गणपू तर पुढल्या वर्षीं पेन्शन घेणार; तेव्हां आपला वशिला खर्च करून आतां मुलाला 'कॉलेजांत घालणार' असं तो पुष्कळ वेळां बोलून दाखवी. मराठी शाळेंतच जेमतेम शिकलेला त्याचा तो मुलगा नाहींतर कॉलेजांत कसा जाणार बरं एकदम ??—तीच अखेरची अजब सिद्धि करणार होता तो!...

—पण मग, त्यावरच तर गणपूची म्हातारपणची उरलीसुरली आशा !!—




# [७]

## [–कामगार–]

–१–

पैशाच्या ओझ्याखालीं श्रीमंत चेंगरतात तसेच गरीबही चेंगरतात;...पण थोड्या निराळ्या अर्थानें !...

आणि म्हणूनच म्हणावं लागतं कीं रुका सारं जग चालवतो !!...'दुडु-ब्रम्हा...दुडुर्विष्णु...दुडुर्देवो महेश्वरो...'

निसर्ग बापडा मनापासून म्हणतो— ' सारे सुखी व्हा !'

पण मानवी स्वार्थानें त्याला धाब्यावर बसवलं आहे !!...तो म्हणतो '...मी जगाचा राजा !–'

गरीबी–श्रीमंतीचं बंड किंवा पैशाची किंमत त्यामुळेंच वाढली आहे ! ...नाहींतर पैशाचा आपला संबंध काय ??

अमर्याद स्वार्थ हाच जगांतला ब्रम्हदेव ! ..आणि मानव–निर्मित परि-स्थितीच मनुष्याला व त्याच्या हृदयाला, 'गर्भ–श्रीमंत' अथवा ' गर्भ–गरीब ' करते ! !–जगाचा न्यायच आहे हा...

वीतभर पोटाची खळगी भरण्यांतच...सबंध आयुष्यंच्या आयुष्यं ( तीं सुद्धां अतिश्रमानें लहान होऊन ) नाहींशीं झालेलीं पाहिलीं कीं डोळे भरून येतात !...सबंध जगच बघतां बघतां अस्पष्ट होतें !!...

पण तरीही, मानव स्वतःला अतिश्रेष्ठ प्राणी ठरवतो !

माणसानें स्वतःच काढलेलं स्वतःचं चित्र तें ! याहून निराळं कसं असणार ?



–२–

व्यक्ति आणि झुंड !...जगांत चोहूंकडेच हा लढा चाललेला दिसतो !! ...पण विशेषतः गिरणींत तें ज्यास्त ठळक दिसून येतं;...अन् तिथं व्यक्तिच जिंकते तो अनादि-अनंत लढा !

गिरणींत व्यक्ति म्हणजे मालक !...झुंड म्हणजे कामगार !! आणि साधारणपणें झुंडींतील व्यक्तीला व्यक्तित्व नसतं !...

जगांत जगायचंच तर पोटाची खळगी भरल्याचं सोंग नाहीं करतां येत;.. गरजवंताला तर अक्कलच नसते ! पैशाचं नाटक करणंहि अशक्य !!...

...तेव्हां पुष्कळ गिरण्या यंत्रांवर नि यांत्रिक कामगारांवर अव्याहतपणें चालतात, यांत नवल कसलं ?...

पण, मोटारींतून श्रीमंती वेगानें जात असलं, म्हणजे गरीबीनें पायीं चालणाऱ्यांचे अस्पष्ट चेहरे दिसत नाहींत !...

म्हणूनच जग व्यक्तीसाठीं थांबत नाहीं ! आणि जगाप्रमाणेंच गिरणीचीं यंत्रंहि अव्याहत चालूंच राहतात !...

–३–

पोराबाळांनीं खायचं काय हा प्रश्न फार जाचूं लागल्यावरच, धाकूनें रत्नागिरीजवळचं आपलं खेडं सोडून मुंबईच्या गिरणीची वाट धरली...

' माणिजर ' न् मुकादमाच्या मनधरणीनें त्याला एकदांची नोकरी मिळाली !...परळच्या बाजूस त्याचं बिऱ्हाडबस्तान बसलं; साऱ्या गडबडींत त्याला थोडी उसनवारीही झाली;...पण पुढली आशा होती ना !...

...सुरवातीला त्या खेडवळाला 'ममय'ची गंमत वाटे !...

भोंगा वाजला कीं भोंवतालचे किती तरी लोक काळसर फडक्यांत शिदोरी बांधून झपझप पावलं टाकीत चालतांना दिसत; गिरणीकडे वळणारी, तोंडानें

गप्पा मारीत चालणारी, ती बायका-पुरुषांची लांबच लांब रांग, घाईत जातांना पाहिली, कीं तो स्वतःचं व्यक्तित्व तत्काळ पार विसरून जाई !...

...आपला बिल्ला देण्याबद्दलची व 'खाडा' न लागण्याबद्दलची प्रत्येकाची धडपड, नेमलेलं काम करण्यासाठीं चाललेली आटापीट, यंत्रांची धडधड, दुपारच्या सुट्टींतील प्रत्येकाचा शिदोरीचा कार्यक्रम,—सारं अगदीं यंत्रासारखंच !—हळूं हळूं त्याच्याहि तें अंगवळणीं पडलं.

संध्याकाळीं गिरणींतून परत फिरणाऱ्या त्या स्त्रीपुरुषांच्या झुंडींतील बऱ्याच जणांचीं तोंडं आपल्याच सारखीं उतरलेलीं असतात, हें थोड्याच दिवसांत त्याला समजून आलं !...त्याला दुःख झालं तितकंच समाधानही वाटलं, त्या गोष्टीमुळें ! !...

दुःखांत भागीदार मिळवून सुख शोधण्याची मनुष्याची प्रवृत्तीच असते !.

—४—

गिरणींत त्याला दुसऱ्याहि अनपेक्षित गोष्टी दिसून आल्या !...आपल्या तेरा चौदा वर्षांच्या अंबूला कामाला लावण्यांत, आपल्या संसाराला थोडी मदत होईल,...हाच त्याचा हेतू होता; पण मुकादमाच्या आचरटपणामुळें त्याला एका आठवड्यांतच, तिच्या हितासाठीं,...तिला घरीं बसवावं लागलं.

...धरलं तर चावतं, सोडलं तरी चावतं,...अशांतीलच ती स्थिति ! !—

कधीं कधीं त्याला वाटे, 'आगींतून सुटून आपण नाहक फोंफाट्यांत पडलों !'

'पण आगींत काय न् फोंफाट्यांत काय ?...कुठं तरी पिचत पडायचं हेंच आपलं भवितव्य !—' असं तो आपलं मनाचं समाधान करून घेई ! !—

त्याला राग येत नसे, असं नाहीं !...एखाद्यावेळीं तर त्याला वाटे–" या मुकादम–'माणिजरां'ना ठार करण्याची छाती करावी ! !..."

...पण भडकलेलं डोकं थोडं ताळ्यावर आलं,..कीं त्याला लागलींच पटे–"त्या छातीजवळच आपलं पोट आहे !...आणि पोटाला लागलेल्या पाठीशींच आपलीं बायका-पोरं आहेत ! !..."



—५—

कामाच्या व संसाराच्या चिंतेच्या दगदगीनें त्रस्त झालेल्या त्याच्या मनाला दमल्याभागल्यानंतर उत्साह आणणारं औषधही त्याच्या गिरणींतल्या एका भाईनें त्याला हल्लीं दाखवून दिलं होतं !...

पहिल्या दिवशीं त्यानें तोंड वेडंवाकडं केलंन्; पण दोन दिवसांत त्यानें जोडीदाराला गुरुदक्षणा दिली दोन ग्लास !...

बाटलीच्या नादानें त्याची दैना होते, हें त्याला पटे !...पण पुनः ती त्रस्त मनःस्थितीची वेळ आली कीं त्याचा कांहीं इलाजच चालत नसे ! !...

त्याच्या कपाळची गिरणींतील ती बारा तासांची जीवाची धडपड कधींच सुटत नसे !...लोखंडी यंत्रांबरोबरच तीं जित्या हाडामासांचीं यंत्रंही पोटा-साठीं धडपडत ! !...आणि हें सर्व त्या उष्ण सर्द वातावरणांत...

एके दिवशीं, एका कामगाराचा उजवा हात यंत्रांत सांपडून उचकून निघाला !...त्याला बाहेर नेण्यांत आलं ! !...

लोखंडी व हाडामासांच्या बाकीच्या यंत्रांचं काम मात्र पुढें चालूंच होतं !.

पहातां पहातां, धाकूचे डोळे पाण्यानें भरून आले ! काम करतां करतां त्याचा हात एकदम थांबला ! !...

"एऽ धाक्या !...साला बघतो कुठं ?..." मुकादमाच्या शद्बानें एकदम दचकून त्यानें समोरील काम पुढें सुरू केलं !...

"लौकर काम करून तरी ज़ास्त काय होणार ?..आमच्या नशिबाची बारा तास धडपड न् अर्धीकची मीठभाकर सुधारणार आहे थोडीच ?...देवा, आमची दैना तुझ्याही लक्ष्यांत येत नाहीं कारे ??...कामावर आलों नाहीं, तर उपाशीं मरूं !...आलों तर हे असे जिवंत मरत आहोंत ! !..." धाक्याच्या मनांत येई !...

—६—

थोड्याच दिवसांत शेजाऱ्याच्या सांगण्यावरून, धाकू एका 'युनियन'ला जाऊन मिळाला !...

गरीब-श्रीमंत, कामगार-भांडवलदार यांच्या वर्गयुद्धाविषयीं त्याचे पुढारी त्याला सांगूं लागले, कीं, तो त्यांच्याकडे धगधगत्या मनानें पाही!...कांहीं म्हणत कॉंग्रेसचा गांधी चांगला...कांही म्हणत तो वाईट !...

बरेच दिवस तें सर्व ऐकल्यावर मात्र त्याला एवढी आशा वाटूं लागली कीं, '-आपल्याला सुखासमाधानाची पोटभर भाकर पाहिजे! अन् सर्वांनीं एकी केली तर आपल्याला कदाचित् ती मिळेलही !'

आतां त्याला आणखीहि एक तत्व कळूं लागलं होतं... "मालक काय, ' माणिजर ' काय, किंवा मुकादम काय...कोणी गिरणी चालवत नाहींत !... गिरणी चालविणारे न् माल काढणारे सारे आपणच..."

—७—

आणि मग हळूहळू संपाची भाषा ऐकूं येऊं लागली !...

संप म्हणजे काय ?...अजून पूर्वी कधींच तो कसा नव्हता झाला ? ?...

त्यांचे पुढारी त्यांना सांगूं लागले—" संपाची कल्पना कांहीं नवीन नाहीं ! तुमचं हित पहाणारे पुढारी कोणी पुढं येत नव्हते एवढंच !!...ते आतां आम्ही आहोंत !—आमच्यावर आधीं विश्वास ठेवा !—"

येथपर्यंत सर्वांचं जुळे; पण मग कांहीं म्हणत "...हें वर्गयुद्ध आहे बरं !...भांडवालशाहीचा नायनाट होईंपर्यंत हें असंच चालायचं ! !..."

दुसरे कांहीं म्हणत—" आपले मालक आपल्याला हृदय नाहीं असं वागवतात !...गरीबीची पोटभर भाकरही न देतां गुराढोरांसारखे मरेमरेतों राबवून ठारच मारतात म्हणा ना ! !...आधीं आपले कामाचे तास कमी झाले पाहिजेत !...योग्य ती पगारवाढ झाली पाहिजे ! !...नफ्यावर आपला हक्क असला पाहिजे ! ! ! "...

धाकूला तें अगदीं शंभर टक्के पटे; ' पण होणार कसं हें ? ' त्याला प्रश्न येई.



त्यावर ते पुढारी म्हणत, "बंधूनो, एकट्या दुकट्याची डाळ बलाढ्यापुढं शिजत नसते !...जुट करून...संप करून...आपण त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करूं !!...आपल्या दीन स्थितीकडे पाहून,...त्यांनीं आपलं म्हणणं ऐकलं, कीं, पुन्हां ते मालक न् आपण मजूर !...यंत्रं आपणच चालवायचीं !...तीं कायमचीं बंद पाडून चालणार नाही आपलं...निजगाचं !...तेव्हां ते सोन्याचे दिवस येईं तोंपर्यंत जुटीनें संपावर राहून उपाशी मरण्याची पाळी आली तरी हरकत नाहीं ! ईश्वर आहेच आपला पाठीराखा ! चंग बांधून धीरानें तयार व्हा ! !... "

—८—

त्यांच्या पुढाऱ्यांनी मांडलेल्या निर्वाणीच्या अटी मान्य झाल्या नाहींत व शेवटीं सर्वांनुमतें संप पुकारला गेला !...

ठरल्या दिवशीं ठरल्या वेळेला, थोडी सुद्धां आदळ हापट न करतां, सर्व मजूर शांतपणें आपापल्या गिरणींतून रांगेनें बाहेर पडले !...

लाठ्या घेऊन बंदोबस्तासाठीं आलेल्या सरकारच्या पोलिसांना, कांहीं न करतां, गुपचूप परत जावं लागलं ! !...त्या दिवसाची त्यांची 'ड्यूटी' संपली !...

संपास सुरवात होऊन जवळजवळ तीन आठवडे झाले होते; कामगारांची स्थिति अतिशय शोचनीय होती; धाकूचंहि व्यक्तित्व त्यांतच गुंतून राहिलं होतं ! !...आणि त्याच्यामागें त्याचं बायको-पोरांचं कुटुंबही सारं ! ! !...

—९—

जीव जगवण्यासाठीं सुरवातीलाच कितीतरी जण बोटीनें मुलखाला गेले !

" गांवकरांनुं तुमकां येणां नाय ? ? " धाकूच्या गांवच्यानें चौकशी केली...

" कित्याक ?...हंयसारच बरा असा !... हो संप आणीक किती दीस चालतलो ईश्वराक ठाऊक !..." धाकूनें कांहींतरीं सांगितलं, त्याच्यापुढें कर्ज, पोरंबाळं...सर्व दिसत होतं !...

जवळपास उसनवारीलाही वाव नव्हता इतकी सर्वांचीच दीन स्थिति !—

बायकोचा आजार जास्त झाला !... पोरं भुकेनें तळमळूं लागलीं !

सभा भरून पुढारी बोलत !...पण संप थांबण्याची भाषा, आशा दिसेना !...

गिरणींच्या मालकांचा झुंडीच्या भवितव्याच्या ठरावावर वादविवाद चाले; (स्वतःस) समाधानकारकपणें सर्व प्रश्न सुटणार असल्यास ते पहात होते ...

पुढें ढकललेला एकेक दिवस मजुरांना मात्र युगासारखा वाटे !...

स्वतःपेक्षां आपल्या मुलाबाळांचं तडफडणं पाहूनच त्यांचा जीव तळमळे !

—१०—

धाकूचं नशीब शेवटीं फिरलं !...

त्याची आजारी बायको सर्व तऱ्हेच्या त्रासानें, परिस्थितीच्या एकंदर परिणामानें, लहान मोठ्या मुलांना उघडी टाकून निघून गेली !...

धाकूला केवढा जबर धक्का बसला ?...आतां त्याला दारू पिऊन मारहाण करायलाहि हक्काची प्रेमळ बायको उरली नाहीं ! !...

पण त्यापेक्षां 'आतां तिच्या उत्तरक्रियेची व्यवस्था कशी करायची' हीच चिंता त्याला जास्त डिंवचूं लागली ! !...

...बिचारीचा देह जाळण्यासाठीं लागणाऱ्या लांकडांची जेमतेम व्यवस्था करण्यांसाठींच इतरांनीं दिडकी दोन दिडक्या वर्गणी करून तरतूद केली !...

या असह्य दुःखामुळें झुंडीतल्या धाकूचं व्यक्तित्व एकदम जागं झालं !...

—११—

...बायकोचा शेवटचा निरोप घेऊन तो परत येतो तों मजुरांची जंगी सभा व मिरवणूक असलेल्याचं त्यानें ऐकलं ! धाक्याचे पाय यंत्राप्रमाणें तिकडे वळले !—तो तिथं जमलेल्या कळपांतला केवळ एक ठिपका होता...



सभेच्या ठिकाणीं पुष्कळ लोक जमले होते...वक्ते पुढारी म्हणत होते,... "हें वर्गयुद्ध असंच चालायचं !...भांडवलशाही नादान झाली आहे ! !... तिला वठणीवर आणूंया ! संप असाच जोरानें पुढें चालला पाहिजे !!!..."

धाकूच्यानें आतां राहवेना; तो मोठ्यानें ओरडून म्हणाला—"साहेब, आमकां तुमचा-तां काय तां समजणां नाय !...बायकांपोरां मेलीं मगे मागून काय करूंचा तां युध ?...निसत्या शद्बान् काय आमची पोटां..."

त्याला कोणीं मागं खेंचून बसवलं. (पुढाऱ्यांच्या बोलण्याला अडथळा होऊं नये अशी पुष्कळांची नेहमींच इच्छा असते !...) आणि भाषण पुढें सुरू झालं...एकदोन ठरावहि पसार झाले.

—१२—

आणखी दोन दिवसांनंतर—

जगांतल्या न्याऱ्या विषमतेला कंटाळून, उपासमारींत मेलेल्या आपल्या तीन वर्षांच्या पोराला मूठमाती देऊन धाकू दुःखित अंतःकरणानें परतला.

त्या उपाशी कामगाराच्या दुःखी अश्रूंची किंमत लाखांनीं मोजण्यासारखी असली तरी ते त्याक्षणीं तरी धुळींत मिसळत होते ! !...

...मोटारी धांवत होत्या !...ट्रामगाड्या फिरत होत्या ! !...

जगाचं व्यक्तिच्या सुखदुःखाकडे लक्ष नसतं !...आणि गाडं असंच अव्याहत चालूं रहातं ! !...रहाटगाडगं...हो, रहाटगाडगं...

तसल्या दुःखित अंतःकरणानें धाकू आपल्या शून्य खुराडांत शिरला, इतक्यांत रस्त्यावरून जाणारा एक वर्तमानपत्रवाला पोऱ्या ओरडूं लागला—

"कामगारांची मिरवणूक पोलिसांनीं लाठी चालवून मोडली !...पंधरावीस जखमी व चार जण ठार !...गिरणी मालकांना अटी साफ नाकबूल...कामगारांची भयंकर हलाखीची स्थिति !!...उद्या बहुतेक संप मोडणार !!"...

—१३—

धाक्या ताडकन् उभा राहिला !..."मोडणार संप ? मगे तो झालो कशाक ?

माजी माघारीण...माजं चेंडू!...संपाचो होच का उपेग ?....मालकाक हृदयच नसा??..."

दुःख, राग, हतबलपणा सर्वांमुळें त्याला रडूं कोसळलं!...

त्याला वाटलं-'तडक जावं व आपल्या मालकाचं निष्ठूर हृदय फोडून काढावं बाहेर!...त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडवाव्यात!...'

तो घरांत गेला; आपल्या मोडक्या ट्रंकातून लपवून ठेवलेला काबूली चाकू काढण्यासाठीं तो वांकला...

तोंच—

—१४—

त्याच्या सहा वर्षांच्या शिवानें धांवत येऊन त्याच्या गळ्याला मिठी मारली!

धाकूचा राग, खुनशी निश्चय...सर्व जिथल्या तिथं पार विरघळून गेलं!..

'आपण गेलों तर आपल्या पश्चात ह्या पोरांचं'...

त्याला ती कल्पनाही सहन करवेना!...

त्यानें झटकन् शिवाला उचलून त्याचे पटपट मुके घेतले!! ..

—१५—

तिसऱ्या दिवशीं गिरणी चालूं झाल्या!

तेव्हां सर्व झुंडीबरोबर धाकूही पुन्हां गिरणींत काम करण्यासाठीं शिरला!!..

पुढाऱ्यांचं म्हणणं चुकींचं नव्हतं!-धाकूही चुकला नव्हता!-पण सारी मानवीजातच चुकत होती!!—

योग्य जाणीव नि योग्य वेळ अजून यायची होती!-आणि-तोंपर्यंत!...

तोंपर्यंत ती भावी आशा!!...केव्हां होणार तो मानवजातीचा काया-पालट ?...



[८]

# केशवमामा [-कारकून-]

—१—

कोणी विचारलं तर ते सांगत-"'जी. पी. ओ.' मध्यें 'क्लार्क' आहे!"

इंग्रजी अमदानींत 'कारकून' सारखे देशी शद्ब कमी दर्जाचे ना!...

केशवमामा मागें कॉलेजांत होते,...तेव्हां त्यांच्या शेजारचा विद्यार्थी वाचनाचा व वादविवादाचा जास्त भोक्ता;...त्याचं नेहमींचं वाक्य असे-"अरे केशवराव, हिंदुस्थानला ध्येयशून्यतेचा मोठा रोग लागला आहे!...आणि..."

त्याच्या कटकटीला केशवमामा कंटाळत; ..तो मात्र त्यांच्या मागंच लागे. तो त्यांच्या आयुष्याचं ध्येय विचारूं लागला, कीं, केशवमामा जांभई देत त्याला सांगत-"कसल्या गंभीर विषयांत शिरतां बुवा उगीच ?...अहोऽ सध्यां ज्यूनिअर इअर आहे. तोंवर मौज तरी करून घ्यावी!!..."

आणि मौज म्हणजे, इकडे तिकडे भटकत असणं; अर्थहीन चकाट्या पिटणं; पत्ते झोडणं; पुष्कळ उशीरापर्यंत झोंपून रहाणं; वगैरे वगैरे वगैरे—

त्यांचा शेजारीहि मोठा चिकाटीचा; सीनिअरमध्येंही त्यानें केशवमामांना तोच प्रश्न केला!—पण त्यांच्यामतें, तो विचार करायचा वेळ यायला, अजून सबंध सीनिअर इअर जायचं होतं!!

—२—

अखेर वर्षांनंतर, त्यांचा शेजारी एका विषयांत नापास झाला; केशवमामा मात्र परिक्षेंतून शीरसलामत पसार झाले!

पण त्याचं सांत्वन करावयास ते गेले, तेव्हां त्यानें केशवमामांना पुन्हां... तोच प्रश्न केला...

नेहमीचाच तो प्रश्न;...पण जरा अनपेक्षितपणें अनपेक्षित वेळीं आल्यामुळें, केशवमामा भयंकर चपापले व गोंधळलेही ! !—

ते म्हणाले–' अजून तसं ठरलं नाहीं बुवा काय तें ?–पण सध्यां तरी बहुते[illegible] एलएल्. बी टर्मस् भरून टाकाव्यात म्हणतोंय् !–पुढचं मग पहातां येईल !'

केशवमामांचा तो तीन वर्षांचा सहाध्यायी व शेजारी मुकाट्यानेंच हंसला !

—३—

ऑक्टोबरमध्यें पास होऊन–त्यांचा शेजारी हिंदुस्थांनातील एका खेड्यां[illegible] कसला गाजावाजा न करतांच शिरला !

केशवमामा मात्र लॉ टर्मस् भरण्याचा व ' युवर मोस्ट ओबीडिअं[illegible] सर्व्हंट ' म्हणून अर्ज लिहिण्याचा धंदा करूं लागले.

शेवटीं एकदां गोळी लागली ! केशवमामांच्या वडिलांनीं खर्च केलेल[illegible] वशिला लागूं पडला. केशवमामा 'जी. पी. ओ.'त पन्नासावर 'चिकटले' !... तेव्हां अर्थात् लॉ टर्मस् भरण्याचं त्यांना आतां कारणच उरलं नव्हतं !...

पुढल्या पंधरा वर्षांतील केशवमामांच्या परिस्थितींतील फरक इतकाच कीं, आतां ते सात मुलांचे वडील झाले होते; पगार नव्वदाच्या घरांत गेल[illegible] होता; आणि त्यांचे वडील ( आपल्या आयुष्यांत आलेला नोकरीचा स[illegible] अनुभव केशवमामांना सांगून ) स्वर्गस्थ झाले होते !

—४—

त्यांचा बाकीचा कार्यक्रम नेहमीप्रमाणेंच अव्याहत चालू असे...

आणि डेलीपॅसेंजरचा दुसरा कार्यक्रम कार्यक्रम तो काय असणार निराळा ?...



[illegible]काळीं उठलं,...कीं, ब्रश तोंडांत घालून, जवळच्या गृहस्थांकडचा [illegible]इम्स ' पहायचा !' तोंपर्यंत आठ; मग चहा घेऊन जरा शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे [illegible] वीस पंचवीस मिनिटं घालवावीं,...तों साडेआठाचा सुमार !...

" काय रे बाब्या ? गाढव, उनाडतोयस् नुसता ?...मास्तर कांहीं अभ्यास [illegible] नाहींत वाटतं ? अंऽ!..." वगैरे मुलांना थोडा धाक दाखवणं प्राप्त; ( कारण नाहींतर तीं शेफारून जायचीं ना ! )

तोंच त्यांची दृष्टी घड्याळाकडे जाई; 'अरे बापरे, नवाला तीन मिनंट [illegible]हेत !...इंऽ मला अंघोळीला पाणी काढाऽऽऽऽ...हा आलोंच मी ! '... [illegible]णत तांब्या उचलायचा !...परत येऊन, दोन चार तांब्ये या खांद्यावर व [illegible] खांद्यावर घेई तों सव्वानवाला दोनतीन मिनिटं !...

[illegible]थून मात्र हिशेब मिनिटांवर सुरूं !...

—५—

[illegible]तर येऊन, ' इं, आटपा आटपाऽ, मला काय उपाशी पाठवायचा [illegible]चार दिसतोय् वाटतेऽ ?' म्हणून त्राग्यानें म्हणत, साडेनवाला पांच मिनिटं [illegible]पर्यंत जेवण संपवायचं !...

[illegible] तीन मिनिटांत कोटटोपी चढवली, कीं—खिशांतलं खांड [illegible] टाकीत रस्त्यावर उडी मारायची;...व नऊ अडतीसपर्यंत स्टेशनवर [illegible] नऊ चाळीसची गाडी जेमतेम गांठायची !...

" इं, काय...[illegible], तुम्ही [illegible] गीता !...बहुतेक हृदयाशींच [illegible] अंऽ ?...नकोरे ! [illegible] ; इं चल पाहूं...इं: इं:...काय '[illegible]' ?...माझी 'ट्रू रॉयल'...हाडक्या गेम !...पार्टनर, यांना आतां खास [illegible] द्यायचा !...अरेऽ ? काय मसजीद आलं;...आटपा आतां !...संध्याकाळीं [illegible] फारटच नाऽ ?...वाट पहा हं माझी;..उतरा, उतरा !..अंऽ ? होय !... [illegible] !...लेकाला आणखी तो दाखवायला कशाला पाहिजे ?.....त्रास

बुवा या मोटारींचा !.....हं आलंच आतां !....कायरे, हेडक्लार्क आले नाहींत ना अजून ? ठीक..." अशातऱ्हेनें जाऊन ऑफिसच्या खुर्चीव प्रथम ऐसपैस बसायचं !!

"तसं नव्हे...('गाढव आहांत !...ग्रॅज्युएट कसे झालांत ?...ही इतकी साधी चूक...') पण साहेब...माझा काय त्यांत दोष ?...किरकिरेनं ते माझ्याकडं पाठवलं...('......') नाहीं नाहीं साहेब, तें उद्यां करीन, आतां गाडी...('......')"

"...बऽरं !...शिंचा असा त्रास देईल !! बस बाबा, केशवराव !...चुकेल गाडी कदाचित् !...हं, आतां धे घाल म्हणावं तुझ्या बोडक्यायर !!... हें पहा...हंऽ...झालं ना, साहेब ?...जातों...हो हो, त्याची नको तुम्हाल काळजी !..." अशा पद्धतीनें ऑफिसच्या बाहेर यायचं !

पुन्हां गाडींत 'नोट्रंप' न् 'ट्र नलोज'चा किंवा 'झब्बू'चा हैदोस !

"त्या शिंच्याला कुठची हो वरली ग्रेड ?..त्याच्या आधीं मी ! होऽ...अन अक्षर काय घाण हो लेकाचं;...हेडक्लार्क नेहमीं चिडतो ! म्हणतो आत पहिलीच्या कॉप्या घडवा !! घ्या...ह्या...हॅ...हॅ...आज ही कल्याण फास्ट किती हळूं चालली आहे ?...मुलुंद गेलं वाटतं...चल उतरतोस नारे, पानसे !...कां चिडलास वाटतं रबर दिला म्हणून ?...थांब ! इथं थोडी कोथंबीर घेतों..हंऽ...अग ऐक ग छबेऽ, आतां रात्रीची मस्ती काय आहे ?... ही साखर;...हें लोणी...न ही भाजीची जुडी..." अशा तऱ्हेनें घरांत शीरसलामत पुनरागमनं !...

यानंतरचा कार्यक्रम जेवणाचा; तोंपर्यंत नऊ सव्वा नऊ व्हायचे. जवळचे कोणी आलेच तर धाकट्या मंदाला खांद्यावर टाकून तिल थोपटीत अर्धातास गप्पा; मग दहाच्या आंत झोंप !

सर्व कार्यक्रम कसा अगदीं 'टाईमशीर',...आटोपशीर ! जरा इकडे नाही कीं तिकडे !...डोळं झांकून...नाकासमोर...



—६—

याला सणाची किंवा रविवारची सुट्टी मात्र खो घाली;...नेहमीं उठल्या दगदग धांवपळ; ती आज नाहीं ! म्हणून आनंद !!...

पण मग घालवायचा कसा सबंध दिवस ?...हा एक मोठा प्रश्नच !

शनिवारीं रात्रीं जेवणानंतर पत्त्याचा अड्डा बसायचा एक एक वाजेपर्यंत; मग सकाळीं साडेआठपर्यंत झोंपेची राखण !...'हो, आठवड्यांतून एक दिवस मिळायचा सारा असा;.....तर तो तरी साजरा करावा.....' हा साध्या माणसाचा साधा विचार !...

उठलं कीं तोंडधुणं चहा होईपर्यंत व्हायचे साडेनऊ ! नंतर बाजारांत निघायाचं; चारसहा दुकानांत बसायचं रेंगाळत 'वेळ घालविण्यासाठीं,' वाण्याशीं गप्पा मारीत !...ठरल्या भाजीवाल्याकडून एखाद-दुसरी भाजी घ्यायची; दुसरं कांहीं खरेदी करायचं असलं तर तें करून, यायचं निवांतपणें साडेअकरा पावणेबाराच्या सुमारास घरीं !...

नंतर अंघोळ जेवण म्हणेपर्यंत पाऊण एक; थोडी वामकुक्षी होईतों होताहेत तीन सव्वातीन !...

पुन्हां 'मंडळी' जमायची एके ठिकाणीं; चहा ढोंसला कीं बसला "अड्डा" 'पोथी' सोडून, थेट जेवणाची वेळ होईपर्यंत.

हातानें पानं वाटण्याच्या वेळीं तोंडानें गप्पा चालावयाचा सर्वांच्या त्या ऑफिसमधील कमीजास्त 'हेवी वर्क'च्या किंवा साहेबांच्या !...

पानं वाढल्याचं छबी सांगायला आली कीं, 'चला, संपला बुवा रविवार हकाचा !' म्हणत जांभई देत जेवायला उठायचं !...

जेवणानंतर एखादं पुस्तक हातांत घेऊन झोंप येईपर्यंत अंथरुणावर लोळायचं !...हातांतलं पुस्तक म्हणजे झोपेचं औषधच...

सगुणाबाईनीं ते झोपलेसं पाहिलं कीं दिवा बारीक करून, सैरावैरा

लोळणाऱ्या मुलांना बिछान्यावर नीट ओढून घ्यायचं; चिमुकल्या मुलाला पोटाशीं घेऊन त्यांच्या मध्येंच झोंपायचं !

रात्र संपली; सोमवार उजाडला; झाला पुन्हां नेहमींचा कार्यक्रम सुरू !!..

—७—

आयुष्यांत केशवमामांच्या या क्रमांत एकदां खंड पडला होता;...आणि तो म्हणजे सरकारनें मागं 'रिट्रेंचमेंट'चं बंड काढलं होतं तेव्हां !...

सरकारी नोकरी अगदीं निरुपद्रवी; कधीं जाण्याची भीती नाहीं ! पण सरकारच असं उलटून घात करूं लागलं तर काय करायचं ?...

केशवमामांना त्या महिन्या दीडमहिन्यांत जेवणही जात नसे नीट !

पण शेवटीं केशवमामा ग्रॅज्युएट म्हणून त्यांची 'निवडणूक' झाली फिरून;...ते कायम झाले...

त्यांना त्या दिवशीं काय आनंद झाला; त्यांनीं एका आख्या रुपयाचे पेढे वाटले; सर्वांचीं तोंडं गोड झालीं !...

—८—

कॉलेजांतला त्यांचा शेजारी, गांधी आयर्विन समेटानंतर, ठाण्याच्या तुरुंगांतून सुटला. घरीं परत जातां जातां सहज केशवमामांकडे वळला !...

त्याचा एकंदर पोशाख वगैरे पाहून मामांनां आश्चर्यच वाटलं !!...

कॉलेजमधून गेल्यापासून तो त्या एकाच खेड्यांत रहात होता; सुरवातीला पोटापुरती शेती, वाचन व इच्छा असलेल्या खेड्यांतील लहानमोठ्या अशिक्षितांना शिक्षण देणं, यांतच त्याचा वेळ जात असे.

दोन तीन वर्षांत त्यानें आपलं खेडं नमुनेदार व सुशिक्षित केलं होतं !...

हळू हळू त्यानें लहान मुलांना व्यवस्थित शिक्षण देण्यासाठीं एक संस्था



चालविली. त्यांत जिल्ह्यांतील निरनिराळ्या भागांतून चाळीसपन्नास लहान मुलं येऊन राहिलीं होतीं. त्यांना विविध शिक्षण देण्याचं काम, तो, त्याची सुशिक्षित पत्नी व तिचा भाऊ ( आणि त्याचा मित्र ) असे तिघे करीत.

समाजसुधारणेसाठीं लेख, लघुकथा वगैरे लिहीत असल्यामुळें महाराष्ट्र-वाङ्मयसेवकांतहि त्याचा बराच वरचा क्रम लागूं लागला होता; त्या एकंदर मूक पण भरीव कामगिरीमुळें त्याला त्याच्या जिल्ह्याचं इतक्या अवधींत कॉंग्रेस पुढारीपणहि आलं होतं.

आणि त्या पुढील हकीकत केशवमामांपुढें हृदयरूपानें होतीच !

—९—

तरी त्यांनीं त्याला प्रश्न केला—' एकंदर प्राप्ती वगैरे ?'

तो त्यावर नेहमींसारखाच हंसला !

म्हणाला, " केशवराव, हिंदुस्थान देशाप्रमाणेंच आम्हीहि जन्माचे दरिद्री नि असेच रहाणार !!...माझं, बायकोचं नि माझ्या एकुलत्या एका मुलाचं —तो आतां सहा सात वर्षांचा आहे—सुखासमाधानानं पोट भरतं. बायकोच्या नि तिच्या भावाच्या संगतींत आनंदानें रहातों !...लहान लहान मुलांत मिसळून त्यांच्या उत्कंठा व जिज्ञासा तृप्त करावयाच्या, स्वतः वाचा-लिहावयाचं, मला वेळहि पुरेसा पडत नाहीं !...पण यापेक्षां मोठी कमाई म्हणजे सर्व गांवकऱ्यांचं मजवरील हृदयापासूनचं अकृत्रिम प्रेम;...हेंच आमचं दारिद्र्य न् हीच आमची श्रीमंती !...ज्याला जसं वाटेल तसं म्हणावं !...."

केशवमामा कांहीं वाचतच नसत तर त्याचे लेख त्यांना कुठून ठाऊक असणार ? तो बोलत होता;...केशवमामा मान हलवीत 'होहो' म्हणत होते...

—१०—

पण तो निघून गेल्यावर मात्र ते स्वतःशींच विचार करूं लागले !...

त्यांना त्यांतलं कांही मुळींच पटेना !...

" छेः शेतांत राबायचं...धडपडायचं !...पुन्हां शिकवायसाठीं घसेफोड नि दगदग करायचीच ! !...अन् एवढं करून मिळणार काय तर म्हणतो पोटापुरतं...आणि तें सुद्धां मोजकं मिळेलच असं नेहमीं कोणी सांगावं !... गांवकऱ्यांचं नुसतं प्रेम घेऊन काय चाटायचंय !!..." केशवराव जांभाई देत विचार करीत होते—

—" त्यापेक्षां आमची आपली सरकारी नोकरी बरी; धास्ती नाहीं, दगदग नाहीं !...महिन्याचे तीस—तीस तरी कुठचे हो,...सव्वीसच–दिवस सरकारी छपराखालीं, शांत सावलींत, कागद खरडून उडवले, कीं, महिन्या-च्या महिन्याला नव्वद रुपये !.....तेवढे सरकार नाहीं सरकारचा बाप देईल ! ! हें आमचं आहे हें काय वाईट आहे !..."

—केसूमामांनी त्या वेळीं सोडलेल्या त्या समाधानी सुस्कार्‍यांत त्यांच्या जीवनचाकोरीचा भावीकालचा खडखडाटच दडला होता.

---




[ ८ ]

## —' लखपतीऽ' !

—१—

' वधाऽरो लखपतीऽ ! ' ट्राम स्टँडजवळ एक पोऱ्या हातांत लहानशीं काळीं-तांबडीं पुस्तकं घेऊन ओरडत होता. प्रत्येक ट्राम थांबतांच तो दोन्ही बाजूंच्या खिडक्यांजवळून फिरून गिऱ्हाईक शोधीत असे. पण तरी तो इतका विक्रीच्या फिकीरींत दिसत नव्हता. त्याला ठाऊक होतं कीं,...त्याला तीं हातांतील पुस्तकं संपविण्यास फारसा वेळ लागणार नाहीं.

" एऽ इधर लाव ! " एक साधासाच मनुष्य आपल्या मळकट व जुनाट कोटाच्या आंतील खिशांतून पैसे काढीत म्हणाला. त्याच्याच मागून एक शेट्या, एक पगडीवाले, एक एक पुस्तक घेऊन निघून गेले. इतक्यांत त्या पोऱ्याचं लक्ष एका हळू हळू जाणाऱ्या शानदार ' सलून ' मोटारीकडे गेलं. ' साहेब !" तो हातांतील पुस्तक पुढें करीत आंत बसलेल्या अपटु-डेट मनुष्याला म्हणाला.

मोटार हळू हळू चालली होती. ' साहेबां 'नीं हात बाहेर केला. पोऱ्यानें मोटारीबरोबर धांवत धांवत जाऊन एक पुस्तक; त्यांच्या हातांत ठेवलं पैसे चुकते होतांच मोटार पुढें निघून गेली.

—२—

मोटार बराच वेळ चालल्यावर एका बंगल्याजवळ उभी राहिली. आंतील

' साहेब ' खालीं उतरले. शॉफरला कांहीं सांगून बंगल्यांत निघून गेले. घंटा वाजवितांच दरवाजा उघडला.

" ओऽहो ? मि. मानकामे ? सकाळींच कोणीकडे बुवा ?" आंतील गृहस्थ उठून आलेल्या गृहस्थांच्या खांद्यावर हात टाकीत म्हणाले.

" एनी ट्रिप्स फॉर टु डे ऽ ? " मि. मानकामे हंसत हंसत म्हणाले.

" भले ऽ ! मी त्याचसाठीं आतां तुमच्याकडे येणार होतों ! ! " आंतील गृहस्थ मि. मानकाम्यांना म्हणाले.

" हंऽ ! तें ठाऊक आहे बरं का, पळनीटकर ? तसले लपंडाव नकोहेत ! मी आतांच लाव्याकडं जाऊन आलों. तो म्हणाला पळनीटकराला बित्तंबातमी लागली आहे काल संध्याकाळीं ! म्हणून मी थेट इकडेच आलों. हं,... आतां बोला पाहूं; मग मी माझ्या ' सजेशन्स ' सांगतों ! "

" बरं तर—" पळनीटकर टेबलाचा खण उघडीत म्हणाले. "पण काय हो, शिंचा चांगलाच जिरला बरं का लाटे गेल्या खेपेला ! मी दिलं त्याला ' माऊंट अरगॉस 'चं नांव ठोकून ! भोट लेकाचा ! गुंतवलेन् त्याच्या नांवावर न् आतां बसलाय् माझ्या नांवानं शंख करीत ! मी काय करणार, तो ' ऑलसोरॅन 'मध्येंच आला त्याला ! "

पळनीटकर जोरजोरानें हंसले. त्यांनीं खुणा केलेलं एक पुस्तक बॅ. साहेबांच्या हातीं दिलं; नि डोळे मिस्कीलपणें मिचकवले.

" माझं अगदीं याच्या विरुद्ध झालं ! " बॅ. मानकामे पुस्तक घेत घेत म्हणाले. " त्या केतकरला लेकाला मी मुद्दाम चकवायला ' ईस्टर्न ब्लूम 'चं नांव सांगितलं. त्यानें आंधळ्यासारखं माझं ऐकलं. मी त्याला कांहीं ' एक्स्पेक्ट ' करीत नव्हतों. आणि मग मी कशाला त्यांच्यांत गुंतवूं म्हटलं ? भरले दुसऱ्याच घोड्यावर. पण गंमत ही झाली कीं ' ईस्टर्न ' आला एकदम ' फ्लूक ';... न् माझा फुकट गेला. लेकाचं नशीब शिकंदर खरंच. अहो, ' डिव्हिडंड 'ही बरंच मोठं मिळालं हो त्याला ! आम्ही दोन-अडीचशें घालवून बसलों. छे: ! आज आपली तर हिंमत चालत नाहीं ! "



बॅरिस्टरसाहेब तोंड आंबट करीत हातांतील पुस्तक चाळूं लागले. त्यांनीं आपलं पुस्तक काढून आपलीं अपेक्षित नांवं अजमावून पाहिलीं.

–३–

" हें पाहीलंत का ?" पळनीटकर कांहीं नवीन आठवल्यासारखं करून त्यांच्या हातांतील आपल्या खुणा केलेल्या पुस्तकाचं एक पान उघडून, हंसत हंसत बोटानें कांहीं दाखवीत मानकाम्यांना म्हणाले, " अगदीं नक्की ! "

" काय ' शिपशेप ' ? अहो म्हणतां तरी काय ? " बॅ. मानकामे आश्चर्य घाटल्यासारखं करून म्हणाले.

पळनीटकरांनीं मागचीं पुढचीं पानं दाखवून त्यांची खात्री करण्याचा प्रयत्न केला.

" अहो, माझं ऐका तुम्ही, हा अगदीं नक्की ! ! जॉकीकडून...है !—" ते हंसत पुन्हां डोळे मिचकवीत म्हणाले.

" खरंच ?...पण आपली कांहीं आज छाती होत नाहीं बुवा ! " बॅ. मानकामे सुस्कारा टाकून म्हणाले.

" अरे, इसमें क्यॉ डरना ! " पळनिटकर त्यांच्या पाठीवर थाप मारीत म्हणाले. " असं कसं चालेल पाय मागं घेऊन ? आपण तर बुवा पाहणार डाव टाकून ! !–न् तुम्ही तरी काय असं अगदींच नवशिक्यासारखं करतां ! अबे देखो तो संई ! ! "

बॅरिस्टरसाहेबांना पुनः जोर आला.

" बरं चला ! पण–" नंतर ते दोघे थोडा वेळ हळूहळू बोलत होते. त्यांचा बेत सर्व ठरल्यावर बॅ. मानकामे खालीं आले.

त्यांच्या दोघांच्याहि तोंडावर आशापूर्ण प्रसन्नता झळकत होती.

-४-

'रेस स्पेशल'ला कोण गर्दी होती. सर्व क्लास तुडुंब भरले होते. नवीन डबे जोडूनसुद्धां सर्वांना जेमतेम जागा मिळावयास मारामार पडत होती. गाडी भरभर स्टेशनामागून स्टेशन टाकीत होती. आंतील शेट्ये, वकील, बॅरिस्टर सर्वजण अजूनहि आपापसांत घोड्यांची चर्चा करीत होते. कोणी आपण 'विन'मध्यें लावणार असें सांगत होता;...तर कोणी 'प्लेस' मध्यें लावल्या-पासून कसे फायदे होतात याची लांबलचक यादी देऊन वर्णन करीत होता. कांहीं द्रुद्धाचार्य नवशिक्यांना सल्ला व धीर देत होते.

गाडी स्टेशनांत येऊन दाखल होतांच, एकच गोंधळ उडाला. मोटारी, टांगे भराभर मैदानाकडे धावूं लागले. पण त्यापूर्वींच आंत बसलेल्यांचीं मनं मैदानावर दाखल झालीं होतीं. शर्यतीला अजून वेळ होता; पण त्यांच्या मनांत निरनिराळ्या आशा आतांपासूनच आपापसांत शर्यत खेळत होत्या. टांग्यांचे घोडे पाहून आपल्या आवडत्या घोड्याची व त्याच्या वायुगतीची कित्येकजणांना आठवण होत होती. मैदान जवळ येऊं लागलं तसतसं कांहीं जणांना घोडामैदान जवळ येत चालल्यासारखं वाटूं लागलं.

प्रत्येकाच्या तोंडावर आशाच प्रामुख्यानें उमटलेली दिसत होती.

-५-

कितीजण येत होते न् किती जात होते.

सूटमध्यें असलेले युरोपिअन, अँग्लो-इंडिअन, हिंदी;..कांहीं नवीन मिळणारी माहिती वहींत लिहीत येणारे कच्छी पागोटेवाले शेट्ये;....उंच टोपीचे पारशी, फेझकॅपवाले मुसलमान, पागोटे-फेटेवाले दक्षिणी;...सर्व तऱ्हेचे लोक तिथं फिरत होते. त्यांत 'हिंदुस्थानच्या सद्यःपरिस्थिती' वर व्याख्यान देणारे गांधी टोपीवाले, परवांच एका जुगाराच्या अड्यावर हल्ला घालून 'आरोपीं'ना अटक करून नेणारे सब-इन्स्पेक्टर, वगैरे बरेच सभ्य गृहस्थही दिसत होते! टाइम्समधील 'प्रिस्सीलेचा दृष्टिकोण' अगदीं वक्तशीरपणें वाचून केलेल्या आजतागायत पोशाखांतील युरोपिअन व पारशी स्त्रिया नि त्याचप्रमाणें कांहीं शेठाणी..., हातांत चामड्याच्या पैशाच्या पिशव्या अडकावून, घोळक्या घोळक्यानें, आपापसांत हंसत खिदळत, 'विजयी वीर वरी' चर्चा करीत, मोहक चालींत चालतांना आढळून येत होत्या.



जिकडे तिकडे एकच एक गोंधळ माजला होता.

-६-

घोड्यांचीं नांवं बाहेर पडतांच, आपले घोडे शेवटचे एकदां ठरवून प्रत्येक-जण तिकिट ऑफिसकडे धावूं लागला. बोर्डावर प्रत्येक घोड्याच्या नांवाचीं कितो तिकिटं खपलीं त्याचा नंबर भराभर यंत्रानें चढत होता. वीसपंचीस मिनिटांत 'घण्‌घण्' घंटा वाजूं लागून सर्व देवघेवीचा व्यवहार बंद झाला नि शर्यतीला सुरवात झाली.

घोडे धांवत होते. प्रत्येकाच्या मनांत कालवाकालव सुरू होती. शर्यत संपली; यंत्र बेरीज वजाबाकी करूं लागलें. पांच मिनिटांत सर्व तयार झालं; 'डिव्हिडंड ऑफिस' उघडलं. लोक पैसे घ्यायला तिकडे धांव ठोकूं लागले. तें सुरू होतं आहे इतक्यांत दुसऱ्या शर्यतीतील घोड्यांचीं नांवं बाहेर देखील पडलीं.

पैसे घेणाऱ्या लोकांकडे पाहून निराश झालेल्या लोकांना आशा उत्पन्न झाली. 'एकामध्यें नाहीं, दुसऱ्या वेळीं तरी आपण जिंकूं!' जिंकलेल्यांमधें डिव्हिडंड वांटून होईपर्यंत त्यांचा निश्चय ठरला.

घंटा वाजूं लागली. दुसऱ्या शर्यतीची इशारत झाली. पहिल्या शर्यतीचा जमाखर्च संपला. दुसरी शर्यत सुरू झाली.

—७—

एकमागून एक शर्यती चालल्या होत्या! प्रत्येक वेळीं तिकिटं खपत होतीं !!

...दिवस संपला, शर्यती संपल्या !!

किती जणांच्या आशा सफल झाल्या;...कितीं वा प्रयत्न फोल ठरला. कांहीं आनंदून, कांहीं दुःखानें निराश-पण निराश नाहीं म्हणतां येत त्यांना, ते आपलं नशीब पुढील आठवड्यांत अजमावण्यास कमी करणार नव्हते-होऊन घरीं परतत होते!

गाडीला सकाळसारखीच गर्दी होती. गाडींत सकाळसारखीच गडबड चालू होती; पण बऱ्याच जणांचे चेहरे उतरले होते.

बॅ. मानकामे व त्यांचे मित्र यांपैकींच एक मनःस्थितींत होते!

पण अजूनही आशा-निराशेचा खेळ त्यांच्या मनांत चाललाच होता!!...

सुखांत दुःख, दुःखांत सुख!...हो, एकाच्या सुखांत दुसऱ्याचं दुःख!... दुसऱ्याच्या दुःखात तिसऱ्याचं सुख...अशी अखंड सांखळीच सांपडते या जगांत...

आहे त्या स्थितींत कोण संतुष्ट असणार? म्हणूनच आशानिराशेचं चक्र फिरतं...म्हणूनच साऱ्या विविधतेसकट जगाचं चक्रहि अव्याहत फिरत असतं!!-

आशा!... अमर आशा...

—रघुवीर सामंत संपादित—

★

आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवाङ्मय